ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**डिसेंबर २००८**
**वर्ष २८ वे, अंक १२ वा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **धनंजय गांगल**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : संस्थांना १०० रु.**
**व्यक्तींना ६० रु.**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला,
टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर,
ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@yahoo.com
granthali01@rediffmail.com
marathividyapeeth@rediffmail.com



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


स. न.

मुंबईत नुकत्याच झालेल्या अमानुष हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, जड मनाने आणि दहशतीच्या सावटाखाली हा रुचीचा अंक सादर करत आहोत. या दहशतवादी हल्ल्याविरुद्ध प्रचंड संताप, चीड आणि निषेध समाजाच्या सर्वच थरांतून व्यक्त होत आहे ही आशेची बाब आहे. समाजाच्या जिवंतपणाचे ते एक लक्षण आहे. ही चीड व्यक्त करण्यासाठी पन्नासेक हजार लोक कुलाबा येथे उत्स्फूर्तपणे जमले होते. त्यात अनेक तरुण होते. समाजात विखुरलेल्या आणि सुप्त अवस्थेत असलेल्या ऊर्जेचे ते प्रतीक होते. समाजात अपेक्षित बदल घडवण्यासाठी या ऊर्जेला एकत्र साखळीत बांधायची गरज आहे. असे नेटवर्किंग करायची व विधायक कार्याच्या दबावगट बांधायची भूमिका 'ग्रंथाली' सातत्याने मांडत आहे. आजच्या घडीला ही गरज तीव्रतेने जाणवते आहे.

'निर्माण' या समर्पक नावाने डॉ. अभय व राणी बंग काही विधायक काम करत आहेत. यातील एक अनुभव दीपा देशमुख यांनी या अंकात व्यक्त केला आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी असलेली 'कृतार्थ' ही मुलाखतमाला आता चांगलीच बाळसं धरू लागली आहे. यातील दीपा श्रीराम व वसंत सरवटे यांचे मनोगत शब्दबद्ध केले आहे शर्मिला पिटकर यांनी आणि 'राज्यस्तरीय मराठी वाचकस्पर्धा' या महत्त्वाच्या उपक्रमाबद्दल लिहीत आहेत प्रा. केशव परांजपे.

रुची दिवाळी अंक आवडल्याचे अनेक फोन, पत्रं, इ-मेल व एसएमएस आले. त्या सगळ्यांनाच पोच व धन्यवाद देत आहोत आणि रुची दिवाळी अंकाप्रमाणेच हाही अंक आपल्याला आवडेल अशी आशा व्यक्त करतो.

**– संपादक**

## अनुक्रम


- **प्रा. वि.रा. जोग स्मृती राज्यस्तरीय मराठी वाचकस्पर्धा**/ प्राचार्य केशव परांजपे/२
- **'निर्माण' काय आहे?**/ दीपा देशमुख / ४
- **'कृतार्थ' मुलाखत दीपा श्रीराम**/ ९
- **'कृतार्थ' मुलाखत वसंत सरवटे**/१५
- **अक्षरांचं औदुंबर**/ वैजनाथ महाजन /२१
- **माझी मी (आत्मकथन)** / प्रा. सिंधू पटवर्धन/२३

# प्रा. वि.रा. जोग स्मृती राज्यस्तरीय मराठी वाचकस्पर्धा

प्राचार्य केशव परांजपे

प्रा. विवेक रामचंद्र जोग - माझे मराठीचे प्राध्यापक. १९ जुलै २००५ रोजी ते अकस्मात निर्वतले. त्यानंतर आजपर्यंत सतत त्यांची आठवण येतच राहते- एखादे नवीन पुस्तक वाचले, जुनेच पुस्तक नव्याने वाचले, एखाद्या शब्दाची व्युत्पत्ती सापडली किंवा शोधावी वाटली, एखादा कार्यक्रम बसवायला घेतला की मन सहजच जोगसरांना साद घालते आणि ठेचकाळते. या ठेचकाळण्यातून सावरण्याचा काहीतरी मार्ग काढायला हवा असे भान, सरांना जाऊन दोन वर्षे पूर्ण होता होता आले आणि मनाने घेतले की सरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वाचकस्पर्धा घ्यावी!

सर उपक्रमशील, विद्यार्थिप्रिय प्राध्यापक होते. वक्तृत्व, कथाकथन, नाट्यवाचन, नाट्य, संगीतरसास्वाद, निबंधलेखन, ललितलेखन, संशोधनात्मक प्रकल्प असे सर्वच उपक्रम सर समरसून चालवत. तरीही त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यातले काहीही न करता वाचकस्पर्धाच घ्यावी असेच वाटले, कारण सरांनी कित्येकांना त्यांच्या कॉलेजच्या दिवसांत वाचते केले. कॉलेजच्या दिवसांत विद्यार्थ्यांना वाचण्यापेक्षा आपण काहीतरी लिहावे-बोलावे यातच अधिक रुची असते. या प्रयत्नांना प्रोत्साहन देतानाच सर त्यांना वाचनाची गोडी लावायचे. कल बघून सर त्याच्या हातात पुस्तक ठेवायचे. काही दिवसांनी त्या पुस्तकावर काहीबाही विचारायचे, सांगायचे आणि सरतेशेवटी त्या विद्यार्थ्यांकडून त्या पुस्तकावर काही लिहवून घेतल्यावरच एक आवर्तन पुरे व्हायचे. या संपूर्ण प्रक्रियेत कधी जोर-जबरदस्ती, धाक, चिडचिड, अवहेलना यातले काही नसायचे. असायचा तो फक्त धीर!

सर साक्षेपी पण स्वागतशील वाचक होते. त्यांचा हा संस्कार सहजच त्यांच्या सान्निध्यातल्या विद्यार्थ्यांवर होत असे. आमचे महाविद्यालय हे वाणिज्य शाखेचे महाविद्यालय. तरीही सरांनी आमचे नाते जुळवून दिले ते साहित्याच्या व्यापक पसाऱ्याशी! एम.कॉम. झाल्यानंतर चौदा वर्षे सहकारी प्राध्यापक म्हणून मला सरांचा सहवास लाभला. महाविद्यालयीन उपक्रम चालवताना सर नेहमी म्हणत की लेखक, वक्ते, अभिनेते, गायक यांच्यासारखी चांगल्या वाचक विद्यार्थ्यांची दखल आपल्या व्यवस्थेत घेतली जात नाही. सरांचे ऋण मानण्यासाठी म्हणूनच वाचकस्पर्धा घ्यायचे ठरवले. विनय नवरे, अनिल हर्डीकरसारखे सरांचे विद्यार्थी आणि माझे मित्र आणि सुषमा फडके, अरूंधती कामत आणि सायली दामले या सरांच्या (आणि माझ्याही) विद्यार्थिनी वाचकस्पर्धेची कल्पना कृतीत उतरवण्यासाठी सरसावल्या आणि पंधरा-वीस वर्षांपूर्वी जे महाविद्यालयात करत असू ते थोड्या-मोठ्या प्रमाणात करून बघायचे ठरवले.

लोकसत्तेत, आल्हाद गोडबोले यांनी स्पर्धेची संकल्पना कोणतीही काटछाट न करता सरांच्या फोटोसह छापली. सांगलीहून अरुण नाईक यांचा हार्दिक प्रतिसाद इतका उत्साहवर्धक होता की पहिल्याच वर्षी स्पर्धा मुंबई-पुण्याच्या वेशी ओलांडून सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद (सुरेश राठीच्या सहकार्यामुळेच!), शोभना भिडेच्या भरवशावर नाशिक या ठिकाणी पोचली. स्पर्धेच्या या दुसऱ्या वर्षी बुलढाण्याच्या प्रगती वाचनालयाचे नरेंद्र लांजेवार पूर्ण निष्ठेने बरोबर आले. 'अमळनेरच्या सानेगुरुजी' वाचनालयाचे भाऊसाहेब देशमुख आणि वरोऱ्याचे (जि. चंद्रपूर) प्रा. संजय साबळे यांनी आग्रहाने स्पर्धेची प्राथमिक फेरी आपापल्या गावी मागून घेतली. गेल्या वर्षी कणकवलीहून कोल्हापूर केंद्रावर स्पर्धेसाठी हजर राहिलेल्या प्रसाद घाणेकरांनी स्पर्धा कणकवलीत नेण्याचा संकल्प गेल्याच वर्षी केला आणि या वर्षी तो सिद्धीस नेला. फोंडा (गोवा) इथून निदान आठ-दहा स्पर्धकांना कणकवली किंवा कोल्हापूर केंद्रावर, प्रवासखर्च देऊन पाठवायचे असे कालिदास मराठे यांच्या संस्थेने ठरवले आणि होता होता फोंड्यालाही स्पर्धेचे केंद्र मिळाले. प्रा. राजेंद्र मुंढे (वर्धा), श्रीकांत आणि छाया गोखले (अकोला), जितेंद्र माने आणि प्रा. जवळगेकर (लातूर) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील सहभाग गेल्या वर्षीच्या पाचशेच्या संख्येवरून या वर्षी एक हजारपर्यंत वाढला.

स्पर्धेची प्राथमिक फेरी वस्तुनिष्ठ प्रश्नपत्रिकेची लेखी फेरी असते. पुस्तकांचे लेखक, विषय, प्रकाशनकाल, लक्षवेधी व्यक्तिरेखा, मार्मिक उद्धृते यांविषयी या प्रश्नपत्रिकेत प्रश्न विचारले जातात. ललित, वैचारिक, समीक्षा, शास्त्रीय अशा विविध प्रकारच्या वाङ्मयाविषयी हे प्रश्न असतात. प्राथमिक फेरीत ग्रंथजगताविषयी सामान्य ज्ञान आणि वाचनाची व्याप्ती जोखण्याचा प्रयत्न असतो. या फेरीतून अंतिम फेरीसाठी निवडलेल्या प्रत्येक स्पर्धकाची प्रकट मुलाखत मान्यवर परीक्षक घेतात. या मुलाखतीमधून वाचनाची खोली-आकलन आणि साक्षेप पाहिला जातो. प्राथमिक फेरीची प्रश्नपत्रिका अवघड असल्याचे मत गेल्या वर्षी आणि याही वर्षी बहुसंख्य स्पर्धकांनी नोंदवले. तरीही गेल्या वर्षी शंभरपैकी एक्याण्णव गुण मिळवून नाशिकच्या सुषमा जोशी प्राथमिक (आणि अंतिम फेरीतही) सर्वप्रथम आल्या. या वर्षी सांगली केंद्रातून स्पर्धेत उतरलेला बावीस वर्षांचा श्रीराम मोहिते शंभरपैकी ८६ गुण मिळवून प्राथमिक (आणि अंतिम फेरीतही) सर्वप्रथम आला. गेल्या वर्षी अंबरीश मिश्र आणि रवींद्र लाखे हे अंतिम फेरीचे परीक्षक होते. या वर्षी अंतिम फेरीत स्पर्धकांना बोलते

करण्याचे काम परीक्षक सतीश काळसेकर आणि माधुरी पुरंदरे यांनी केले. युवा गटातला (१६ ते २५ वर्षे) सर्वात लहान स्पर्धक वरोऱ्याचा बाळ पावडे. त्याने ग्रामीण भागातील एकूणच वाचनाची दुरावस्था आणि अभावग्रस्त जीवन यावर आपल्या सहजस्फूर्त आणि अस्सल मराठीत असा काही प्रकाश टाकला, की सारेच स्तब्ध झाले. सर्व सुविधा, पुस्तकांची किंवा कोणत्याही गोष्टीची त्वरित उपलब्धता असलेला शहरी विभाग आणि शाळेला जाणारा पक्का रस्ताही उपलब्ध नसलेला ग्रामीण विभाग यांच्यातील असमतोल भयावह आहे. तरीही ग्रामीण विभागात वाचनाची भूक आहे. मराठी वाचनसंस्कृती कुठे आहे आणि तिची जोपासना करण्यासाठी किती मोठा वाव आहे याची जाणीव या स्पर्धेने प्रकर्षाने करून दिली अशी प्रतिक्रिया परीक्षक सतीश काळसेकरांनी व्यक्त केली.

याच संदर्भात मुंबईतला प्राथमिक फेरीच्या आयोजनाचा अनुभव विषण्ण करणारा आहे. गेल्या वर्षी मुंबईतील रूपारेल आणि रुईया महाविद्यालयांनी प्राथमिक फेरीचे आयोजन विनामूल्य केले होते. या महाविद्यालयातील मराठी विभागातील सर्वच विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांच्या प्रोत्साहनामुळे स्पर्धेत भाग घेतला होता. या वर्षी प्राथमिक फेरीचा दिवस सुटीचा – २ ऑक्टोबर होता आणि महाविद्यालयांच्या प्रथम सत्रपरीक्षा अगदी तोंडावर होत्या. या कारणाने या महाविद्यालयांतून कोणीही भाग घेतला नाही आणि म्हणून महाविद्यालयाचे वर्गही स्पर्धा घेण्यासाठी उपलब्ध होऊ शकले नाहीत!

युवा गटातल्या सुमारे सातशे स्पर्धकां–तून केवळ वीस–पंचवीस स्पर्धक शंभरपैकी पन्नासपेक्षा अधिक गुण मिळवू शकले. गुणांची सरासरी तर दहा ते पंधराच्या मध्येच येईल. अंतिम फेरीसाठी विविध केंद्रांवरून स्पर्धक निवडताना किमान गुणांचा कोणताही निकष लावता आला नाही इतकी परिस्थिती दयनीय होती. तरीही अंतिम फेरीतील याच स्पर्धकांच्या मुलाखती अत्यंत आश्वासक होत्या. प्रौढ गटात (पंचवीस ते पंचावन्न वर्षे) लेखी चाचणीच्या बाबतीत फार वेगळी परिस्थिती नव्हती. मुलाखतींतून मात्र त्यांची वाचनाविषयीची छंदाच्या पलीकडे, ध्यासाच्या जवळ जाणारी तळमळ जाणवली. वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते; चिरंतन मूल्ये मनावर ठसतात, आत्मविश्वास वाढतो आणि आत्मिक आनंद मिळतो अशीच सर्वसाधारण धारणा दिसून आली. 'पुरुषांबरोबर वावरताना एक स्त्री म्हणून आपण कुठेच कमी नाही असा आत्मविश्वास वाचनाने दिला' असे स्पर्धक मीनल दफ्तरदार म्हणाल्या. 'लाच दिल्याशिवाय कदाचित जगता येणार नाही, पण लाच घेतल्याशिवाय नक्कीच जगता येईल' हा विश्वास वाचनाने दिला असे पोलिसाची नोकरी सोडून शिक्षकी पेशा स्वीकारणारे संदीप आलगावकर म्हणाले. वर्ध्याच्या प्रतीक पुरींची कहाणी तर विलक्षण आहे. वाचनावरून घरात टोकले जाते म्हणून ते तीनदा घर सोडून गेले होते. अकोल्याच्या रावसाहेब काळेंना प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांतील अंतराने पार गांगरवून टाकले होते. विविध संदर्भकोषांचा आधार घेऊन त्यांनी या अंतरावर सेतू केला. कोल्हापूरचे पांडुरंग कुलकर्णी यांनी वाचन आणि व्यक्तिमत्त्व यांतील नाते सांगताना माणसाची अंत: प्रवृत्ती वाचनाने बलवान होते असे मत मांडले. 'मृत्युंजय' आणि 'कोसला'– दोन्ही कसे आवडू शकते अशा परीक्षकांच्या प्रश्नावर मंदार जोशींनी बाणेदार उत्तर दिले– 'ते वाचकांचे स्वातंत्र्य आहे!' प्रौढ गटातील स्पर्धकांपैकी बरेच जण शिक्षकी पेशातले आहेत. या वाचनवेड्या शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्येही वाचनसंस्कृती रुजावी म्हणून अनेक उपक्रम आपापल्या शाळा–महाविद्यालयात चालवले आहेत. कोणी वेतनाचा पाच टक्के भाग पुस्तक खरेदीसाठी राखून ठेवतो, कुणी चांगल्या लेखांच्या प्रती काढून विद्यार्थ्यांमध्ये वाटतो. या स्पर्धेच्या निमित्ताने दूरदूर विखुरलेले वाचनसंस्कृतीचे निष्ठावान पाईक एकमेकांना भेटले; अनुभव व कल्पनांची देवाणघेवाण झाली. या भेटींतून प्रत्येकाला कुठेतरी दिलासा मिळाला; प्रत्येकाचे मनोधैर्य वाढले आणि हेच या स्पर्धेचे खरे यश आहे.

'वाचक स्पर्धा' या संकल्पनेचे फारच चांगले स्वागत झाले आहे. कोल्हापूरच्या महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य सुनीलकुमार लवटे यांनी तर ही स्पर्धा शालेय, कनिष्ठ महाविद्यालय, पदवी महाविद्यालय, पदव्युत्तर शिक्षणक्रम आणि खुली अशा विविध गटांसाठी स्वतंत्रपणे घेण्याची सूचना करून कोल्हापूर जिल्ह्यात तरी संपूर्ण सहकार्याची हमी दिली आहे. चांगल्या वाचकाची दखल घेण्याबरोबरच वाचनाला दिशा देण्याचा प्रयत्नही या स्पर्धेतून केला जातो. वाचनवेग वाढवण्याचे उपाय, वाचनाच्या रीतसर नोंदी ठेवण्याची पद्धत या प्रकारचे प्रशिक्षण हाही वाचकस्पर्धा उपक्रमाचा भाग बनावा अशा काही मान्यवरांच्या सूचना आहेत. निदान छोट्या गटाच्या स्पर्धेसाठी पुस्तकांची यादी जाहीर करावी असेही सुचवले गेले आहे. या सर्व सूचनांचा विचार करून स्पर्धा अधिकाधिक वाचकाभिमुख करण्याचा प्रयत्न नक्कीच राहील. स्पर्धक संख्या आणि वाचकांचा दर्जा यांत समतोल साधावा लागणार आहे. किमान अर्हतापातळी (qualifying level) की अद्वितीयता (excellence) याविषयीही धोरण नक्की ठेवावे लागेल. पहिल्या दोन वर्षांचा अनुभव पाहता स्पर्धेचा व्याप निदान पाच हजार स्पर्धक संख्येपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे. केवळ स्वयंस्फूर्तीने हा उपक्रम सुरू करताना निदान पाच वर्षे तो स्वबळावर चालवण्याची बांधिलकी आम्ही – सरांच्या विद्यार्थ्यांनी मानली आहे. या अवधीत, हा उपक्रम महत्त्वाचा असला तर त्याला शारीरिक, नैतिक आणि आर्थिक पाठबळ लाभले पाहिजे आणि ते लाभेल!

**प्राचार्य केशव परांजपे**
ए–३४ , विनीता अंधेरी सोसायटी,
अंधेरी–घाटकोपर लिंक रोड,
चकाला, मुंबई ४०० ०९३
मोबाइल : ९९८७५९९१५१

# 'निर्माण' काय आहे?

दीपा देशमुख

**'निर्माण'चं एक शिबीर २९ जून ते ५ जुलै या कालावधीत पार पडलं. महाराष्ट्राच्या सव्वीस जिल्ह्यांतील च्यौऐंशी युवक–युवतींनी शोधग्राम, गडचिरोली येथे निर्माणच्या शिबिरात भाग घेतला. इथं येणाऱ्या युवकांना काय हवं होतं? कोणती स्वप्नं घेऊन ही सारी शोधग्राममध्ये एकत्र जमली होती? या सात दिवसांत नेमकं काय घडलं? त्याचा हा वृत्तांत...**

दारिद्र्य, बेरोजगारी, विषमता बालमृत्यू, कुपोषण, प्रदूषण व पर्यावरणातील बदल .. समाजातील अनेक समस्या आणि प्रश्नांची, यादी न संपणारी अशीच आहे. या प्रश्नांवर उपाय काय? याचं उत्तर आपण सारेच शोधत आहोत. खरं तर आपल्या सगळ्यांसमोर ते एक आव्हानच आहे. हे आव्हान स्वीकारण्यासाठी, समाजाप्रती निष्ठा असणाऱ्या युवा पिढीची, अर्थपूर्ण जगण्याचा शोध घेण्याची 'निर्माण' ही एक शैक्षणिक प्रक्रिया आहे.

गेल्या दोन वर्षांपासून सर्च, गडचिरोली येथे युवकांच्या शिबिरांची मालिका, स्वाध्यायी, निर्माण स्थानिक गट आदी रूपांत ही प्रक्रिया सुरू आहे. रोजचे जीवन जगताना जाणीव-पूर्वक व अभ्यासपूर्वक ही शिक्षणप्रक्रिया अनुभवायची आहे. महात्मा गाधींच्या 'नई तालीम' प्रयोगाला मार्गदर्शक मानून हा उपक्रम आकार घेत आहे. याद्वारे महाराष्ट्रातील युवकांच्या संवेदना जागृत करून त्यांच्यातील नेतृत्व विकसित करण्यासाठी एक शैक्षणिक प्रक्रियेचा शोध घेणं, हे निर्माण समुदायाचं स्वप्न आहे, उद्दिष्ट आहे.

२९ जून २००८ सकाळी नऊ वाजता शिबिराचं पहिलं सत्र सुरू झालं. ज्यात अम्मानं (डॉ. राणी बंग) सगळ्यांना डोळे मिटायला सांगितलं आणि एका सुबक हंड्यातून एकेक भेटवस्तू मुलांसाठी दिली. ही भेट म्हणजे लर्निंग स्टोन होता. मुलं हातात घेऊन त्याला स्पर्श करत होती, बघत होती.

दत्ता बाळसराफ यांनी सूत्रसंचालन केलं आणि दिग्विजय थोरात या निर्माण-१च्या शिबिरार्थीनं निर्माणविषयीच्या भावना व्यक्त करणारी, त्यानंच चित्रित केलेली फिल्म दाखवली. या फिल्ममध्ये निर्माण काय आहे आणि निर्माणमध्ये काय घडलं, काय अनुभवलं याविषयीच्या भावना होत्या.

यानंतर डॉ. अभय बंग यांनी सर्वांच्या वतीनं शिबिरार्थींचं स्वागत केलं. 'बाहेरून मिळतं ते ट्रेनिंग आणि आतून मिळतं ते लर्निंग' हा दृष्टिकोन त्यांनी मुलांना दिला. ते म्हणाले, 'तुम्हा सर्वांच्या क्षमता आम्ही जाणून आहोत. समाजाचं तारण करतो तो तरुण! जे तुमच्या आत घडेल ती तुमची निर्मिती असेल, तुम्हाला तुमचं निर्माण करायचंय आणि म्हणून आज तुम्हाला एक लर्निंग स्टोन देण्यात आलाय. जे घडेल त्यात माझ्यासाठी लर्निंग काय याचा शोध दोन वर्षांच्या या कालावधीत आता घ्यायचाय. जग आज जसं आहे तसं आम्हाला नकोय, नवं जग आम्ही निर्माण करू इच्छितो हा संकल्प करायचाय.'

निर्माण शिबिराची सुरुवात 'मी'पासून करायची आहे. मी विश्वाला माझ्याच लेन्समधून बघत असतो. सगळ्यात गडद रंग म्हणजे तारुण्याचा! या रंगात प्रेमभावना, लैंगिकता याभोवती शरीर फिरत असतं. नेमकं आपल्या समाजात या गोष्टींचं सतरंजीखाली दडवल्या जाव्यात तशा लपवून ठेवल्या जातात. इतरांसोबतचं आपलं नातं या संकल्पनेभोवती कसं विणलं जाणार आहे हे अम्मा आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानं उलगडतील. आज औपचारिकता जपणारं, कोणतंच वेळ वाया घालवणारं उद्घाटन आपण करणार नाही. आज आपण आपापल्या क्षेत्रातील दिग्गज अशा चार व्यक्तींना बघणार आहोत.. समाजातील प्रश्नांचा वेध घेत गेली वीस-पंचवीस वर्षं या व्यक्ती जगताहेत. यातला कोणीही तुम्हाला उपदेश करणार नाही.. त्यांना एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला जे दिसतंय, जे आव्हान त्यांनी पेललंय, ते चित्रं ते तुमच्यासमोर मांडतील. यातून आपलं लर्निंग होणार आहे. वारंवार आपल्याजवळील लर्निंग स्टोनला तुम्ही स्पर्श करत रहा. तो तुमचा विठ्ठल! तुम्हीही दोन वर्षांच्या वारीसाठीच निघाला आहात. इतका सुंदर समूह यावरील सामील झालाय, या वारकऱ्यांच्या पडावाची चार ठिकाण निर्माणच्या शिबिराच्या निमित्तानं आहेत, सहा महिन्याच्या पडावानंतर पुन्हा यात्रा सुरू असेल.

सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांची पंधरा मिनिटांची 'टुमारो' फिल्म दाखवण्यात आली.

'टुमॉरो'मध्ये राघू आणि त्याची आई हे खरे नट! या फिल्मसाठी आशा वातावरणात (कचऱ्यात, उकिरड्यावर) काम करायलाही पडद्यावरची तथाकथित नटमंडळी तयार झाली नाहीत आणि मग खरं वास्तव जगणारेच राघू आणि त्याची आई यांना पडद्यावर आणलं. चित्रपट हे माध्यम सांस्कृतिक

इतिहास व्यक्त करण्याचं प्रभावी माध्यम आहे. घटना साक्षात उभी करता येते. या घटनेमुळे भावभावना, नातेसंबंध, ताकदीनं, सूक्ष्मरीतीनं टिपता येतात. चित्रपट हे असं माध्यम आहे ज्यातून जीवनाकडे, समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन मिळतो. इट ॲक्टस ॲज ए मिरर, एक महत्त्वाचं टूल म्हणून आपण वापरू शकतो. या त्याच्या क्षमतेमुळेच तो पोरकट, बटबटीत, खोटा, प्रचारी आणि विसंगत वास्तवही उभं करून दिशाभूल करू शकतो. सिनेमाला मनोरंजनाचं साधन मानल्यामुळे शिक्षणक्षेत्रानं इकडे जास्त लक्ष दिलं नाही. आता तर या माध्यमाचंही व्यापारीकरण होत चाललं आहे. मात्र हे माध्यम परिवर्तनाचं साधन म्हणून मानलं पाहिजे असं आम्हाला वाटतं' असं सुमित्रा भावे यांनी म्हटलं. सुनील सुकथनकरांनी संवाद साधताना म्हटलं, 'या माध्यमाचं महत्त्व जाणायचं असेल तर लहानपणापासून पाहिलेले, आवडलेले, न आवडलेले चित्रपट, त्यातले प्रसंग, पात्र, घटना आठवा. काहीतून आपण फसलं गेल्याचं कळतं, तर काहीतून आपल्याला काही मिळतंही. आजच्या टुमारोतल्या राघूच्या अंर्तमनापर्यंत आपण पोचू शकतो का? आपण आपल्या आयुष्यात मश्गुल असतो. आजचे व्यावसायिक चित्रपट आपल्याला भावनेच्या खोट्या पुरात वाहून नेतात आणि चित्रपटगृहाच्या बाहेर येताच ते पुन्हा कोरंडही करतात. राघूच्या निमित्तानं आजच्या तऱ्हेतऱ्हेच्या सिस्टिम्स, सामाजिक स्तर, शिक्षणव्यवस्था, झेंड्याचं महत्त्व कित्येक गोष्टी उलगडत जातात. यातला राघू ढिम्म वाटतो, कारण दु:ख व्यक्त करायला त्याच्याजवळ वेळच नाही. आपल्याला या झेंड्याचा अनादर थांबवायचा असेल तर राघूचा अनादर थांबवायला हवा.'

यानंतरच मान्यवरांचा परिचय केला गेला. इंजिनीयर असलेले अरुण देशपांडे आणि शिक्षकीपेशा असणाऱ्या सुमंगल देशपांडे. या पतीपत्नींनी १९८० साली सोलापूरजवळील अंकोली या गावी विज्ञानाचं एक देऊळ उभारलं. त्यांचं घरं म्हणजे एक प्रयोगशाळाच आहे. घर झाडाला घेऊन उभं, सायकल चालवली की वीज! एडिसनमधला व्यापारी जर काढून टाकला तर जे उरेल ते म्हणजे अरुण देशपांडे. संपूर्ण आयुष्य या माणसाने विज्ञानासाठी झोकून दिलंय.


शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग

अरुण देशपांडे म्हणाले, 'आपली श्रीमंती म्हणजे नॅचरल रिसोर्सेस आहे. आज आम्ही तुमच्या हातात काय देतो आहोत तर, बकाल शहरं, प्रदूषण, गन्स, बॉम्ब अशी वसुंधरा तुमच्या हाती आम्ही देतोय. आपल्याला हे चित्र बदलायचं आहे, निर्माणच्या या प्रक्रियेतून नक्की काही होणार आहे.'

आज विज्ञानानं जी साधनं आपल्या हाती दिलीत त्याचा वापर करून आपण नॉलेज बेस सोल्युशन काढू शकतो. त्यांनी आपल्या मिश्कील, उपरोधिक शैलीतून अनेक उदाहरणं दिली. ज्यात शहरातले प्रश्न, प्रदूषण, माणसातला कृत्रिमपणा व्यक्त होत होता. आळस सोडून कामाला लागलं पाहिजे कारण दु:ख उधळण्यास आता आसवांना वेळ नाही असंही ते म्हणाले.

यानंतर लोकविज्ञान चळवळीतले सक्रिय कार्यकर्ते विवेक सावंत आणि त्यांच्या प्राध्यापक पत्नी संगिता सावंत यांचा परिचय करून देण्यात आला. विवेक सावंत यांचं सी-डॅक, परमसुपर कॅम्प्युटरमधलं योगदान मोठं आहे. ते आज एमकेसीएल (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन) चे संचालक आहेत. संगीता सावंत यांनी सर्व शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या. विवेक सावंत म्हणाले, 'मीही तुमच्यासारखाच एक भाग्यवान आहे, आपल्यासाठी अभय आणि राणी बंग यांनी जो त्याग केलाय तो शब्दात व्यक्त करणं कठीण आहे. आज आपल्याला एक लर्निंग स्टोन मिळालाय, ही कृती मला खूप आकर्षित करते. आपण गडचिरोलीसारख्या एका जंगलात आहोत. येथील प्रत्येक व्यवस्थेमागे किती अफाट कष्ट पडले असतील याची मला जाणीव आहे आणि मला या प्रत्येक गोष्टी बघताना अपराधी वाटत रहातं. आपल्या लर्निंग एन्व्हायरमेंटसाठी यांनी किती कष्ट घेतलेत. सर्चमधल्या प्रत्येक गोष्टीत मला लर्निंग दिसतं.' अन्नाच्या, आरोग्याच्या, शिक्षणाच्या, मनोरंजनाच्या, संचाराच्या, दळणवळणाच्या सगळ्याच क्षेत्रातील आव्हानं आणि ते सोडवण्यासाठीचे मूलभूत प्रयत्न करणाऱ्यांपैकी मीही एक आहे असा उल्लेख करते ते म्हणाले, 'निर्माणच्या शोधातला मी एक विद्यार्थी आहे. नवं तंत्रज्ञान मला अनेक गोष्टींची उत्तरं देऊ शकेल. नवी मूल्यव्यवस्था मला स्वीकारावी लागेल.

समाजात ज्ञानाचं वितरण अत्यंत वेगानं सर्व-सामान्यांपर्यंत येतंय. फक्त वितरण करून थांबता येणार नाही, तर जुन्या विश्वासाशी जोडून घ्यावं लागेल. या ज्ञानाचा सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी उपयोग करावा लागेल. पर्यावरणाशी सुसंगत अशी नवी विकासनीती आखावी लागेल. निर्माणासाठीचं मॉडेल इथं, सर्चच्या या वातावरणात तयार होतंय, नोबेल प्राईझ विजेता वेलिंग्टन त्याच्या भाषणात म्हणाला होता, मी घडलो माझ्या कॉलेजच्या दिवसात. त्याचप्रमाणे तुमच्या यशाच्या प्रसंगी तुम्हालाही हेच दिवस आठवतील आणि तुम्ही या दिवसांचा उल्लेख कराल. या शोधग्राममधला लर्निंगस्टोन तुम्हाला आठवेल.'

विवेक सावंत यांच्यानंतर शेतकरी संघटनेचा बिल्ला लावलेले विजय जावंदिया मुलांसमोर उभे होते. ते म्हणाले, आज आपल्या देशात जय जवान, जय किसान अशी घोषणा आपण देत असलो तरी शेतीचं अर्थशास्त्र संपूर्णपणे भरडलं जातंय. आजच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रश्न त्यांनी मांडले. ते म्हणाले, 'सकाळपासून माझे जे तीन साथी तुमच्याशी बोलले, त्यांच्याइतकी माझी उंची नाही, ना ज्ञानाची ना इतर बाबतीत. मी एक साधा शेतमालक आहे. या व्यवस्थेविरुद्ध उभा राहून नवनिर्माणाच्या शोधात आहे. पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असं म्हटलं जायचं. आज नेमकं उलट झालंय. आज तुम्हाला शेतीविषयी प्रश्न केला तर ती करण्यास तुम्ही सरळ नकार द्याल.' जावंदियांनी हरितक्रांतीच्या धोरणापासून शेतीचं उत्पन्न, शेतमालाचा भाव, सबसीडी, गॅट, डब्ल्युटीओ, अमेरिकेचं धोरण याविषयी शिबिरार्थींना सजग केलं.

या आगळ्यावेगळ्या उद्घाटनानंतर अमृत बंग यानं, मी निर्माणमध्ये का आहे? याविषयी प्रत्येकानं आपल्याला काय वाटतं ते लिहून हॉलमधल्या बोर्डवर लावावं असं सांगितलं.

पंधरा-वीस मिनिटानंतर पिंपळ-मधल्या बोर्डवर एकेक करत वेगवेगळी निळ्या शाईतली मनोगतं झळकू लागली. मी निर्माणमध्ये का आहे याबद्दल मुलांनी लिहिलेले काही मुद्दे असे होते-

जग स्वच्छपणे बघायचंय,

माझ्या करियरचा उपयोग इतरांसाठी कसा होईल?,

बघण्यासाठी, उत्सुकतेपोटी,

काय करायचंय, कसं करायचंय हे समजून घेण्यासाठी,

स्वत:ला समृद्ध करण्यासाठी,

सामाजिक प्रश्नांनी तात्पुरती अस्वस्थता येते, इथं नेमकं काय होणार हे ऐकण्यासाठी!

टू मीट अ‍ॅन्ड कोलॅबरेट पिपल,

निर्माण हे कार्यकर्ते घडवण्यासाठीचं शिबीर असावं, मी मात्र माझ्या प्रश्नांची उत्तर शोधायला इथं उपस्थित!

लहानपणापासून इतिहास आवडता विषय, पण मला भारताबद्दल प्रेम नाही, आजचा भारत जराही आवडत नाही, मला जसा वाटतो तसा भारत निर्माण करता येईल का? या उत्तराच्या शोधात इथं!,

दिशा हवीय.

लिहिताना काहींना खूप वेळ काय लिहावं हेच सुचत नव्हतं, काहींजवळ नेहमीच्या ठराविक साच्यातलं उत्तर तयार होतं. काहींनी काहींचं विखुरलेलं मन अक्षरांतून दिसत होतं.

सकाळच्या सत्राचा परिणाम काहींवर खोलवर झाला असावा असं वाटत होतं. एकजण सांगत होता, माझ्या काकांची शेती आहे, मी मात्र कायम शहरात राहिलो, माझा शेतीशी कधी संबंध आलाच नाही, त्यामुळे शेतीची इतकी बिकट अवस्था असते याचा मी कधी विचराच केला नव्हता. शेतमालाचा भाव, शेतकऱ्याच्या आत्महत्या, व्यवस्थेचं स्वरूप, आंतरराष्ट्रीय धोरण याबद्दल आज माहिती मिळाली जिनं माझे डोळे उघडले.

एक म्हणाला, मला मोठमोठी स्वप्नं बघून समाज कसा बदलायचा हे कळत नाही, पण मला इतकं नक्की कळलंय की स्वत:ला



समृद्ध केलं तर कुटुंबं, समाज आजुबाजूचा परिसर समृद्ध बनण्यासाठी नक्कीच हातभार लागेल.

दुपारी मी, मला समजून घेणं, माझं शरीर जाणून घेणं- याविषयी अम्मा बोलायला उभ्या राहिल्या. त्या म्हणाल्या, आपल्याकडे लैंगिकतेबद्दल बोलणं म्हणजे फार मोठा अपराध असं मानलं जातं. वयात येताना, मुला-मुलींमध्ये होणारे बदल याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

डॉ. राणी बंग यांनी मुला-मुलींच्या शारीरिक बदलाबरोबर मानसिक बदल कसे होतात, मनात निर्माण झालेल्या प्रचंड ऊर्जेबद्दल, भावनांच्या कल्लोळाबद्दल, दडपणाबद्दल, न्यूनगंडाबद्दल सविस्तर माहिती दिली. घरातलं वातावरण निकोप कसं असलं पाहिजे, प्रत्येक विषयावर चर्चा झाली पाहिजे हे आवर्जून सांगितलं. अनेक घरात मुलांना बोलू दिलं जात नाही. आपली चूप संस्कृती कशी आहे याविषयी सांगितलं. लहान-वयातली लग्न, मुलगा-मुलगी यांच्यात फरक करणं, मुलींचं शिक्षणाचं प्रमाण, प्रेमभावना, प्रेम आणि आकर्षण यांतला फरक, पालकांची जबाबदारी याविषयीही संवाद साधला.

स्त्री-पुरुषांची प्रजनन अंग याविषयी डॉ. राणी बंग, अम्मा यांना माहिती खुली केली. मुलामुलींचं लिंग कसं ठरतं, वीर्याचा प्रवास, महाराष्ट्रातील मुलामुलींचं जन्माचं प्रमाण! क्लोनिंग, याविषयी माहिती दिली.

यानंतर अम्मांनी मुला-मुलींच्या मैत्रीबद्दल मुलांशी संवाद साधला. त्यानंतर वंध्यत्व या विषयावर सखोल माहिती दिली. वंध्यत्वाचे प्रकार, स्त्रीला दिली जाणारी वागणूक, स्त्रीची मानसिकता, पुरुषातले दोष, व्यसनांचा परिणाम, स्त्रियांमधले दोष, गुप्तरोग, इतर लैंगिक समस्या याविषयी माहिती दिली. बेजबाबदार लैंगिक वर्तन, बेजबाबदार लैंगिक वर्तन म्हणजे काय, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, गर्भपात, कुमारी मातेचे प्रश्न, गर्भपाताचा कायदा, बलात्कार, गर्भनिरोधक साधनं व त्यांचा गैरवापर, वैवाहिक जीवन, पालकत्व याविषयी माहिती दिली.

कॅन्सर - शरीरातल्या पेशींचा आतंकवाद! कॅन्सरचे प्रकार, गर्भाशयाचा कॅन्सर, स्तनांचा कॅन्सर, स्वरयंत्राचा कॅन्सर, फुफ्फुसाचा कॅन्सर, तोंडाचा कॅन्सर... व्यसनांमुळे होणारे दुष्परिणाम, सेक्स्युयालिटी-समलिंगी, हिजडे, मानसिकता, कायदे, प्रसुतिपूर्व व नंतरची काळजी याबाबत अम्मानं सत्र घेतलं.

या दिवशी सायंकाळी शिबिरार्थींनी आपापला परिचय करून दिला. जयप्रद या शिबिरार्थीनं सांगितलं, माझी आई नेहमी मला दगड म्हणत असते. इथून मी गेल्यावर तिला मी सांगणार आहे, की आता मी नुसता दगड राहिलो नाही तर आता मी लर्निंग स्टोन आहे. हा परिचय खूप वेगळा होता. सगळ्यांना पुन्हा एकदा आपल्या सकाळच्या लर्निंग स्टोनची आठवण झाली आणि सर्वजण आपापल्या कुटचांकडे विश्रांतीसाठी वळले.

शिबिराच्या कालावधीत शोधग्राम दर्शन - शोधग्रामचा सारा परिसर अमृत, राजेंद्र, ज्ञानेश्वर यांनी गटागटाद्वारे सगळ्यांना दाखवला. शोधग्राममध्ये प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूलाच माँ दंतेश्वरी देवीचं मंदिर (आदिवासींचं जागृत श्रद्धास्थान!), माँ दंतेश्वरी हॉस्पिटल, पेशंटसाठी कुट्या, कँटिन, मेडिकल शॉप, ओपीडी, ऑपरेशन थिएटर, ब्लड बँक, ॲडमिनीस्ट्रेशन ऑफिस, रिसर्च विभाग, आदिवासी वस्तूंचं संग्रहालय, प्रार्थनास्थळ, एकलव्य ग्रंथालय, पतांजली सभागृह, गुस्मद विश्रांती स्थळ, व्यसनमुक्ती केंद्र, तलाव, विहिरी, चिकू, फळांची जागा, शबरी, मोहामाऊली भोजन कुटी, कार्यकर्त्यांची निवास व्यवस्था, बालवाडी, चौक (ध्वजारोहणाचं ठिकाण), चंदन (अम्मा नायनांचं निवासस्थान) अशा सर्व ठिकाणांना मुलांनी जाणून घेतलं आणि खरं तर पुढे ट्रेझर हन्ट या खेळात याचा उपयोग सर्वार्थानं मुलांना झाला.

शिबिरादरम्यान अनेक खेळ घेण्यात आले. निर्माण-१ आणि सर्च कार्यकर्त्यांची टीम यासाठी झटत होती.

अमृत बंग यानं सर्व जीवसृष्टी म्हणजे जनुकांची पसरण्याची धडपड यावर एक सत्र घेतलं. शिबिरार्थींच्या प्रश्नांना समर्पक उत्तरंही त्यानं दिली. रिसोर्स पर्सनपैकी नागपूरचे प्रसिद्ध लेखक नंदा खरे आणि त्यांच्या पत्नी विद्यागौरी खरे यांनी मुलांशी संवाद साधला आणि अनेक पुस्तकांची माहिती व यादी मुलांना त्यांनी दिली.

रात्री निरोपाच्या कार्यक्रमात पवन आणि अमित यांनी सूत्रसंचालन केलं. या कलाविष्कारात पोवाडे, कविता, गाणी, नाटुकल्या, बॅले, मूकनाट्य, फिशपॉण्ड, नृत्य प्रकार सादर करण्यात आले. इतक्या कमी वेळात वेगवेगळ्या ठिकाणच्या मुलांमधलं को-ऑर्डिनेशनचा हा एक उत्तम नमुना होता. ऐतिहासिक, विनोदी, राजकारण, सामाजिक प्रश्नांचा उहापोह करणाऱ्या विषयांना मुलांनी स्पर्श केला होता.

एकमेकांना कडकडून भेटत मुलांनी पहाटे साडेतीनला एकमेकांचा निरोप घेत काही क्षणांच्या विश्रांतीसाठी आपल्या कुटीकडे मोर्चा वळवला आणि ६ तारखेला सकाळी, एकेक गटानं, सगळीजणं आपापल्या लर्निंग स्टोनच्या सोबतीनं आपापल्या मार्गाकडे रवाना झाली.

**दीपा देशमुख**
निर्माण समन्वय टीम,
एमकेसीएल, अपना बाजार,
२ रा मजला, सेक्टर-१७,
वाशी, नवी मुंबई
adipaa@gmail.com

**‘आमचा बाप आन् आम्ही – स्वरूप आणि समीक्षा’ला उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती म्हणून तुका म्हणे साहित्य पुरस्कार प्राप्त.**




## आमचा बाप आन् आम्ही – स्वरूप आणि समीक्षा

संपादन : शैलेश त्रिभुवन

बावीस मान्यवर साहित्यिक–समीक्षकांनी लिहिलेल्या ‘आमचा बाप आन् आम्ही’ या पुस्तकाच्या रसास्वादाचं संकलन.

मूळ किंमत ४०० रुपये;

सवलतीत २४० रुपयांत.

घरपोच केवळ २६० रुपयांत.




## आयुर्वेदीय स्त्रीविज्ञान

शुभदा वेलणकर

विशेष अभ्यासातून आणि अनुभवातून साकारलेला ग्रंथ.

मूळ किंमत ४०० रुपये;

सवलतीत २४० रुपये

घरपोच २६० रुपयांत

# 'कृतार्थ' मुलाखत
# दीपा श्रीराम

'ग्रंथाली'तर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी 'कृतार्थ' मुलाखत-मालेत मान्यवर व्यक्तीची मुलाखत होत असते. तेवीस ऑगस्टला दीपा श्रीराम यांची मुलाखत आशा साठे यांनी घेतली. त्याचा हा वृत्तांत.

**आशा साठे –** दीपाताईंची पडद्यावरील व रंगमंचावरील अभिनयाची ओळख आपल्याला पूर्वीपासून आहे. आधेअधुरे, अवध्य, गार्बो वगैरे नाटकांतून भूमिका करताना, 'रूपवेध'ची निर्मिती सांभाळताना आम्ही तुम्हाला पाहिलं आहे. 'अवंतिका' मालिकेतील जहागीरदार-बाईंना आम्ही विसरू शकत नाही. 'नितळ', 'भेट' अशा चित्रपटांतून तुम्ही आम्हाला अभिनयाची नितळ भेट दिली आहे. दीपा बसरूर असतानाही तुम्ही केलेला अभिनय व हालचालींतील लय यांच्या आठवणी प्रेक्षकांच्या मनात अजूनही रेंगाळतात, ही लय कोठून आली?

**दिपा श्रीराम –** मी लहानपणापासूनच डान्स शिकत होते. आम्ही तीन बहिणी. आई ऑफिसात जायची. तिला प्रश्न पडायचा की या तीन मुलींना सतत कसं ऑक्युपाइड ठेवायचं? चित्रा पालेकरची आई ही माझ्या आईची मैत्रीण होती. तिलाही तीन मुली होत्या. त्या दोघींनी मिळून ठरवले, की आपण एक डान्सक्लास काढू. आम्ही तेव्हा गावदेवीला राहायचो. तिथे सोसायटीच्या हॉलमध्ये डान्सक्लास सुरू केला. सुदैवानं आम्हाला राघवन नायर हे चांगले डान्सशिक्षक मिळाले. ते वर्षभर इकडे राहायचे आणि मार्चमध्ये केरळला जायचे. त्यांचं कुटुंब केरळला होतं. ते गेले की मग त्यांचे सासरे आम्हाला कथकली शिकवायचे राघवन भरतनाट्यम शिकवायचे. अशी आठ वर्षे मी डान्स शिकले.

माझे वडील 'यक्षगान' या लोककलेचे कनोसियर होते. त्यांनी सुरूकुंद यांच्याकडून एक वग लिहून घेतला. आम्ही मुली, माझ्या दोन मावश्या आणि सुरूकुंद यांच्या दोन मुली अशा सहाजणींनी त्या 'यक्षगान'मध्ये भाग घेतला होता.

**आशा साठे –** सामान्यत: यक्षगान पुरुष सादर करतात. मग तुम्ही मुलींनी ते केलंत हे कसं?

**दीपा श्रीराम –** माझ्या वडिलांची तीच इच्छा होती की, नेहमी पुरुष करतात हे खरं पण तुम्ही मुलींनी का नाही करायचा? 'एकदा करून बघू' असं ठरवून त्यांनी तो डान्स बसवला. त्याचं हेडगियर फार जड असतं. त्याला किरीट म्हणतात. ते जड असल्यामुळे मेकअप करायला वेळ लागायचा. मला तोपर्यंत लोककला व क्लासिकल यांतील फरक नीट समजला नव्हता. पण यक्षगान करताना मला तो फरक अनुभवायला मिळाला. लोककलां-मध्ये शरीर फार लवचीक असावं लागतं. यक्षगानमुळे लोककलेची लय माझ्या अंगात थोडीशी भिनली.

**आशा साठे –** या सगळ्यामागे तुमच्या आईवडिलांचं प्रोत्साहन कारणीभूत आहे. आजीकडूनही तुम्हाला ते बाळकडू मिळालं आहे. तुमच्या घरातील वातावरण किती कलाप्रिय होतं ते ऐकायला आम्हाला आवडेल.

**दीपा श्रीराम –** आई नृत्य करत नसे पण तिला नृत्य येत असे. तिला नृत्याची आवड होती. आईचे मामेभाऊ मोहन कल्याणपूर हे कथ्थक स्कूलचे प्रिन्सिपॉल होते. आई धारवाडला राहायची. त्यांच्याकडे नृत्य शिकण्याची तिची इच्छा होती. तिच्या सासरीसुद्धा तिला नृत्याच्या आवडीबद्दल प्रोत्साहन मिळाले.

माझी आजी, वडिलांची मावशी ह्या सगळ्या सासू असूनही त्यांनी आईला खूप प्रोत्साहन दिलं. आजी व्हायोलिन वाजवायची. वडिलांची एक मावशी तिला साड्या द्यायची तर एक मावशी दागिने वगैरे द्यायची.

**आशा साठे –** डान्सक्लासमधून तुम्हाला काही संधी मिळाली का?

**दीपा श्रीराम –** मी डान्स करताना इतकी तल्लीन होत असे की ते अडीच तास मला आजुबाजूचे भान नसायचे. 'लॉस एंजलिस स्कूल ऑफ डान्स'चे ली मॉर्गन यांना 'चित्रांगदा' करायचे होते. चित्रांगदाची भूमिका करण्यासाठी ते मुलगी शोधत होते. त्यांनी मला विचारले, 'तू चित्रांगदा करशील का?' मी लहानपणा-पासूनच पुरुषी दिसत असे. मी 'हो' म्हटले. डान्स करायला मिळणार एवढंच त्यावेळी मला महत्त्वाचं वाटलं होतं. मी आईला सांगितले आणि त्यांच्याकडे जायला लागले. मी तीन आठवडे त्यांच्याकडे शिकले. 'फ्रूट गॅदरर्स' ह्या रवींद्रनाथांच्या कवितेवर मला त्यांनी कोरिओग्राफी करायला सांगितलं. नंतर त्यांनी इतर काहीजणांना विचारलं, 'ही किती महिने हे करत असेल असं वाटतं तुम्हाला? ही तीन आठवडेच करते आहे.' सगळ्यांनी मला शाबासकी दिली. नंतर ते म्हणाले, 'आता आपण अमेरिकला जायचं. तू 'चित्रांगदा' पुस्तक वाचायला

आण.' मी आईला ते पुस्तक आणून द्यायला सांगितलं तेव्हा आईला सगळं समजलं. ती म्हणाली, 'तू कुठे त्यांच्याबरोबर अमेरिकेला जायला निघालीस? आम्ही तुला एकटीला नाही जाऊ देणार!' मी तेव्हा फारशी हट्टी नव्हते. त्यामुळे आईचं ऐकलं आणि माझी ती संधी हुकली.

**आशा साठे –** दुबे स्कूलमध्ये कशा पोचलात?

**दीपा श्रीराम –** बी.ए., एम.ए. करत होते. त्याचवेळी मी माझाच शोध घेत होते. संधी मिळेल तशी डान्स, नाटक करत होते.

आईनं डान्सची आवड निर्माण केली, पण ती फिलॉसॉफिकल होती. जे. कृष्णमूर्ती, चिन्मयानंद यांची प्रवचनं ऐकायला मला घेऊन जायची. मला म्हणायची, 'ते जे बोलतात ते माझ्या लक्षात राहत नाही. म्हणून तू सगळं नीट ऐक आणि नंतर मला सगळं सांग.' मी तसं करत असे. त्यामुळे त्यांचे विचार माझ्या मनावर बिंबत गेले. मी थोडी फिलॉसॉफिकल झाले. मला काहीतरी वेगळं हवं आहे, वेगळं करायचं आहे असं माझ्या मनात होतं.

या शोधात मला अनेकांनी हात दिले. मला बोटानं धरून कोणी ना कोणीतरी नेत होतं. मला माझा विकास महत्त्वाचा वाटत होता. मी त्या शोधात होते. अशा वेळी मला अशोक कुलकर्णी भेटला. तो मला मराठी नाटकं पाहायला घेऊन जात असे. तेव्हा 'आपुले मरण पाहिले म्या डोळा', 'पति गेले गं काठेवाडी', 'बंद दरवाजा' अशी नाटकं पाहिली. मला मराठी रंगभूमीची विशेष माहिती नव्हती. व्यावसायिक रंगभूमी व प्रायोगिक रंगभूमी म्हणजे काय ते मला समजले. आमच्या घरात मराठी वातावरण अजिबात नव्हते.

दुबेंच्या ग्रूपमध्ये डिस्कशन ऐकताना मी भारावून गेले. मला त्यांच्यात फार जावंसं वाटलं. अशोक कुलकर्णींच्या बरोबर मी तेथे गेले. 'तुझे आहे तुजपाशी'चं कोंकणी भाषांतर होतं त्या कोंकणी नाटकात मी उषाचं काम केलं होतं. त्या माझ्या कामाबद्दल अशोकनं आणि अमोल पालेकरनं दुबेंना सांगितलं.



मुलाखतीचा शेवट नृत्याभिनयाने करताना दीपा श्रीराम

**आशा साठे –** 'आधेअधुरे' हिंदीत होते, ते मराठीत करायचं दुबेंनी ठरवलं तेव्हा तुमची लागूंशी खरी ओळख झाली. तेव्हाचा माहोल, तुमचा भाषेचा प्रॉब्लेम, तुमची कोंकणी भाषा आणि लागू अस्सल पुणेरी मराठी भाषा बोलणारे हे सगळं कसं काय जमलं? जोडीदाराचं अधुरेपण अधोरेखित करणारं ते नाटक आहे आणि तुम्हाला मात्र आयुष्याचा जोडीदार त्या नाटकानं दिला.

**दीपा श्रीराम –** आम्ही हिंदीत 'आधेअधुरे' केलं त्यात भक्ती बर्वे, अमोल पालेकर, अमरीश पुरी वगैरे होते. मी दुबेला विचारलं. 'मला जमेल का हे काम करायला?' दुबे म्हणाला, 'तू जर घरी बारसं आहे वगैरे कारण सांगून तालमीला आली नाहीस तर नाही जमणार. तू जर कमिटेड राहून तालमीला येणार असशील तर ये.' तेव्हापासून 'कमिटेड' म्हणजे काय ते मला समजलं. जे करायचे ते सर्वस्व झोकून देऊन करायला हवं. भक्ती जसं स्वत:ला झोकून काम करत असे तसं मी करू शकले नाही.

**आशा साठे –** नंतर मराठीत अमरीश पुरीचं काम श्रीराम लागूंनी केलं. बाकी सगळे मराठीच होते, तुम्हीच फक्त कोंकणी बोलणाऱ्या होतात. त्यावेळचे अनुभव सांगा ना!

**दीपा श्रीराम –** हिंदीत आधेअधुरे लोकप्रिय झालं, पण त्याची ऑडिशन मात्र मराठीच असे. म्हणून दुबेंनी ते नाटक मराठीत करायचं ठरवलं. तेंडुलकरांना मराठी भाषांतर करायची गळ घातली. श्रीराम लागूंनी अमरीश पुरीचं काम करायचं मान्य केलं. तेव्हा आमच्या ग्रूपमध्ये कुजबूज सुरू झाली, 'श्रीराम लागू येणार आहेत', 'लागू येणार आहेत'.. मला आश्चर्य वाटलं. मी ललिताला विचारलं, 'कोण आहेत हे लागू?' तेव्हा तिनं मला सांगितलं, 'ते डॉक्टर आहेत पण प्रचंड मोठे डॉक्टर आहेत बरं का! आणि अतिशय शिस्तीचे आहेत.'

मी मराठी 'आधेअधुरे'त काम करायचं ठरवलं पण मला मराठी नीट बोलता येत नव्हतं. खूपच कोंकणी टाइप मराठी होतं माझं. बोलण्यात भाषेचे चढउतार नव्हते. म्हणून मी दुबेला म्हटलं की 'मला मराठी भाषा शिकवणारा ट्युटर बघ.' तो म्हणाला, 'आता कोण शिकवणार तुला मराठी?' शेवटी श्रीराम लागूंनी मला मराठी शिकवायचं ठरवलं. तेव्हा लागू दिवसा मोकळे असायचे. मराठी शिकता शिकता मी लागूंकडून बरेच काही शिकून घेतले. मी निरीक्षण करायला

शिकले. बारीक बारीक टेक्निकसुद्धा बरोबर आणि पक्कं असायला हवं, असं श्रीराम म्हणत असे. श्रीरामबरोबर वक्तशीरपणाचं महत्त्वही मला समजलं.

**आशा साठे –** त्यानंतर तुम्हा दोन नाट्यकर्मींचं एकत्र काम सुरू झालं. 'गिधाडे' तुम्ही केलंत. 'गिधाडे'बद्दल एकीकडे विचारवंतांना ते खूप वेगळं वाटत होतं आणि हिटहॉटवाल्यांना ते आपला आरंभबिंदू वाटत होतं. तुमची भूमिका काय होती?

**दीपा श्रीराम –** मी जेव्हा 'गिधाडे' वाचलं तेव्हा वाटलं काय ही भाषा! मी श्रीरामला म्हटलं, 'अशा नाटकात काम करायला मला घरून परवानगी मिळेल असं वाटत नाही. तेंडुलकरांनी हे असं का लिहिलं?' तेव्हा श्रीरामनं मला समजावलं की 'तेडुलकरांना जे म्हणायचं आहे त्यात शिवीगाळ करणं हा हेतू नाही. समाजात किंवा प्रत्येकाच्या मनात भितीतून निर्माण होणारा जो एक हिंस्रपणा आहे त्याच्याकडे वेळीच लक्ष द्या, नाहीतर आपण सगळेच गिधाडे होऊ असं तेंडुलकर म्हणताहेत.' मला ते पटलं. यातून माझा दृष्टिकोन विशाल झाला. या पद्धतीनंही नाटकाकडे पाहायला हवं, पाहता येतं हे मला नवीन होतं. घरच्यांना मी या नाटकात काम करणं पसंत नव्हतं पण नंतर आई म्हणाली, 'तू होतीस म्हणून श्रीरामनं हे नाटक केलं. दुसऱ्या कोणी ही भूमिका केली असती?'

त्यातल्या 'रेड पॅच'ला सेन्सॉर बोर्डानं हरकत घेतली तेव्हा ह्या लोकांनी त्यांच्यापुढे हट्टानं आपली बाजू मांडली. 'या नाटकाचा परिणाम साधायचा असेल तर आम्हाला असंच दाखवायला हवं.' पण सेन्सॉर बोर्डानं परवानगी दिली नाही. तेव्हा दुबे आणि श्रीराम म्हणाले, 'रेड पॅच नको तर तो निळा करू.' नाटकाच्या प्रयोगाच्या आधी दुबे जाहीर करत की 'हा खरा रेड पॅच आहे पण सेन्सॉर बोर्डाची परवानगी नसल्यामुळे तो निळा केला आहे.' ते ऐकून प्रेक्षक खूप हसायचे आणि टाळ्या वाजवायचे. त्या सीनचा इम्पॅक्ट मात्र तसाच यायचा. लोक चिडीचूप व्हायचे.

आपली मूल्यं मला कृतीत आणायची होती त्यासाठी मला ह्याच माणसांच्यात राहायचं होतं.

**आशा साठे –** तुम्ही लागूंबरोबर गार्बो, उद्ध्वस्त धर्मशाळा ही नाटकं केलीत. अमोल पालेकरांबरोबर गोची, अवध्य केलंत. दुबे, पालेकर, लागू या तीन दिग्दर्शकांबरोबर काम करताना ओढाताण व्हायची का?

**दीपा श्रीराम –** नाही, उलट मला खूप शिकायला मिळालं. दुबे म्हणायचा, 'ही अशी या कॅरॅक्टरची बाऊंडरी आहे.' त्याच्या पलीकडे जाऊन ॲक्टरनं काहीतरी करावं अशी त्याची अपेक्षा असे. मीही तसा प्रयत्न करत असे. 'आधेअधुरे'मध्ये त्यानं मला प्रेक्षकांकडे पाठ करून बसवलं व यांतून कायिक अभिनय करायला सांगितलं. अमोलचं टेक्निक असंच होतं. तो मुव्हमेंट फारशा सांगायचा नाही. भाषेला एक लय असते. तू काय बोलतेस, वाचतेस ते नीट ऐकलंस तर तुला ती लय कळेल असं त्यांचं म्हणणं असे.

मला 'अवध्य'तील कामाला ॲवॉर्ड मिळालं पण मला अमोलचं 'गोची' आवडतं. मला ॲवॉर्डचं महत्त्व कधीच वाटलं नाही. ॲवॉर्ड मिळालं म्हणून मी मोठी आहे असं मला वाटत नाही. कारण मी कशात चांगली आहे, कशात नाही ते मला समजतं.

'चारचौघीं'चे पाच-सहा प्रयोग झाल्यावर एका प्रयोगाच्या वेळी चंद्रकांत कुलकर्णी मला आत येऊन म्हणाला, 'तुमचं काम प्रेक्षकांना आवडतंय हं.' अर्थात मला ते जाणवत होतंच.

**आशा साठे –** इथे मी थोडं स्पष्टीकरण देते. 'चारचौघी'त काम करणाऱ्या इतरांची अभिनयाची पठडी वेगळी होती आणि दीपाताईंची वेगळी होती म्हणून चंद्रकांत कुलकर्णींनी हा अभिप्राय तुमच्यापर्यंत पोचवणं ह्याला एक विशेष अर्थ आहे.

**दीपा श्रीराम –** प्रेक्षकांचा रिस्पॉन्स मिळालेला मला लगेच कळतो. एकदा प्रयोग संपवून घरी गेल्यावर मी श्रीरामला म्हटलं, 'मी आज किती वेगवेगळ्या पट्टीत आवाज खेळवू शकले. ऑडिअन्सनं किती ॲप्रिशिएट केलं!' तेव्हा तो म्हणाला, 'बघ, सावध राहा हं! ऑडिअन्सला काही आवडतंय म्हणून तू तेच करणार आहेस का? तुला जे करायला हवं, भूमिकेला जे आवश्यक आहे तेच तू कर.' माझ्याही हा मुद्दा लक्षात आला, की आपण तेवढंच घेऊन त्याच्यावर खेळत राहणार की जमिनीवर येणार ह्याचा विचार केला पाहिजे. असं ट्रेनिंग मला मिळत होतं.

**आशा साठे –** तुम्ही बोलता बोलता खूप पुढे आला आहात पण आम्हाला मधल्या सगळ्या आठवणी ऐकायच्या आहेत. मधल्या काळात लागूंबरोबर नाटक करता करता एक लग्नाचा टप्पा आला. त्याची काय हकिगत?

**दीपा श्रीराम –** श्रीरामबरोबर मी 'गार्बो' केलं. त्यात मी ॲज ॲन ॲक्ट्रेस टोटल फेल्युअर ठरले. अर्थात फेल्युअर हा सुद्धा सक्सेसच्या वाटेवरचा टप्पा असतो. मला ते नाटक नीट समजलंच नव्हतं. श्रीरामनं मला समजावलं, की ही चार कॅरॅक्टर नाहीत. ही एकाच व्यक्तिमत्त्वाची चार अंगं आहेत. त्यातला एक बुद्धिमान असतो, एक क्रिएटिव्ह असतो, एक व्यावहारिक आणि एक बालिश असतो. या सर्व पर्सनॅलिटींचं भांडण असतं की 'वर्चस्व

कुणाचं?' मी ते नाटक अशा दृष्टीनं पाहिलंच नव्हतं. सुरुवातीला साधा वाटणारा प्रसंग नंतर एकदम मोठा विचार आपल्याला देतो. श्रीरामचा हा विशाल दृष्टिकोन मला भावला.

क्लोज अप आणि लाँग शॉटमधून आयुष्याकडे बघणं, माणसांकडे बघणं हे मला यातून मिळालं. मी जी भूमिका करत होते ती स्त्री स्वत:ला इनकंप्लिट मानते. तिची आई मात्र त्या चार पुरुषांबरोबर जमवून पूर्णत्व शोधते. मग तिच्या लक्षात येतं, की पूर्णत्व मला माझ्यामध्येच शोधायचं आहे, अशी ती भूमिका आहे. मला ती जवळची वाटली कारण मीसुद्धा पूर्णत्वाकडे जायच्या प्रयत्नात होते. खूप काही शिकण्याच्या शोधात होते.

'चारचौघी'च्या भूमिकेत मला जाणवलं, की ही बाई सर्वसामान्य स्त्रीसारखी, घर, मुलंबाळं सांभाळणारी नाही तर ती कंप्लिट होण्याच्या वाटेवर आहे. कोणत्याही टप्प्यावर मला अजून असं जाणवलेलं नाही, की मी कंप्लिट आहे, कृतार्थ आहे. पण हे टप्पे जे होते ते मला कंप्लिटनेसकडे नेत होते.

**आशा साठे** – तुम्ही पुन:पुन्हा 'चारचौघी'कडे येताय पण मला मधले खूप टप्पे जाणून घ्यायचे आहेत. आपल्या क्षेत्रात विकसित झालेल्या व्यक्तिमत्त्वाचे श्रीराम लागू आणि स्वत:ला अजूनही इनकंप्लिट मानणाऱ्या तुम्ही, असं तुम्ही लग्न केलंत. तुमचं आयुष्य नंतर बदललं की नाही?

**दीपा श्रीराम** – माझ्या घरात, नटनट्या म्हणजे दारूडे, युसलेस असा समज होता. माझ्या आणि श्रीरामच्या वयांत अठरा वर्षांचं अंतर होतं. आम्हाला ते कधीच जाणवलं नाही पण घरच्यांना ते जाणवत होतं. त्यामुळे घरच्यांची या लग्नाला फारशी संमती नव्हती. माझ्या दोन्ही बहिणी मात्र खंबीरपणे माझ्यामागे होत्या. मी आईला एकदा म्हटलं, 'तू आमच्या घरच्यांना एकदा भेट तरी!' आमच्या रिसेप्शनच्या वेळी सासरच्यांच्या चांगलेपणाचा अनुभव आला. माझी काकू म्हणाली, 'तुझ्या घरची माणसं किती डिसेंट आहेत!' नंतर आईचं मतही बदललं.

**आशा साठे** – पूर्णत्वाकडे जाण्यासाठी दोघांचा प्रयत्न होता. लागूंसारखा छान स्थान मिळवलेला जोडीदार मिळाला, तुमची तर करियरला, आयुष्याला सुरुवात होती. यातून काही त्रास झाला का?

**दीपा श्रीराम** – थोडा त्रास झाला. लग्न ही ॲडजस्टमेंट असते. माझ्या घरचं वातावरण मिडल क्लास रुटीनचं होतं. सासरी सगळं उलटंपालटं झालं. रात्री आम्ही अडीच-तीन वाजता जेवायचो.

माझ्या सासुबाई गांधीवादी विचारांच्या होत्या. त्यांच्या आचरणात सेवाभाव, प्रेम असे. त्यांनी माझ्या मावशीच्या मिस्टरांचीसुद्धा त्यांच्या आजारपणात खूप सेवा केली. माझी आई आणि सासुबाई दहा वर्षे माझ्याकडे बहिणींसारख्या एकत्र राहिल्या. दोघीजणी एकमेकींना सांभाळत असत.

एकदा आईला सासूबाई मोठ्या आवाजात बोलत होत्या. त्यावेळी माझ्या नणंदेनं मला येऊन सांगितलं की त्यांची आई माझ्या आईला बोलते आहे. हे त्यांना आवडलं नव्हतं. काही दिवसांनी मी आईला त्याबद्दल विचारलं. तेव्हा ती म्हणाली, 'हे बघ, मोठी आई (सासुबाई) माझ्यापेक्षा दहा वर्षांनी मोठ्या आहेत. माझं काही चुकलं तर मला रागावण्याचा त्यांना हक्क आहे. तू त्यात लक्ष घालू नको.' ते ऐकून मला हायसं वाटलं.

**आशा साठे** – छान माणसं असलेलं असं एक छान घर दीपाताईंनी सांभाळलं. दीपाताई बाहेर पडल्यावर माणसं त्यांना जशा प्रकारे भेटतात ते अनुभवल्यावर त्यांच्यातसुद्धा सेवाभावी वृत्ती मुरली आहे हे जाणवतं.

दीपाताई, तुम्ही ह्यात इतक्या गुरफटलात की नाटकात काम करणं फारच कमी केलंत का तन्वीरच्या जन्मामुळे तसं झालं?

**दीपा श्रीराम** – तन्वीरच्या जन्मामुळे असेल कदाचित, पण मला असं वाटायला लागलं की श्रीराम खूप पुढे जातो आहे आणि मी मागे पडते आहे. समजा, श्रीराम आणि आमचे मित्र वगैरे जी.ए. कुलकर्णींच्या कथांबद्दल बोलत असतील तर 'मला ह्यातलं काहीच कळत नाहीये' असं मला वाटायचं. म्हणजे माझ्या जाणिवा फारच बोथट झाल्या आहेत की काय, तसं असेल तर मला त्या जाणिवा ब्रशप करायला हव्या, तीव्र करायला हव्या असं मी ठरवलं. मी नाटकात काम करणं थांबवावं, लेट मी टेक अ पॉज – असा विचार केला. गोष्टी तशाच घडत गेल्या. त्यावेळी माझ्या वयाची मीच एक ॲक्ट्रेस होते त्यामुळे मी अनेक छोट्या छोट्या ग्रूपबरोबर कामं केली होती.

तन्वीर तीन-साडेतीन वर्षांचा असताना मला गणपती दाते भेटले. त्यांच्यामुळे माझी आयएसआयएसडी या संस्थेशी ओळख झाली म्हणजे इंडियन सोसायटी फॉर इंडिव्हिज्युअल ॲण्ड सोशल डेव्हलपमेंट. मला वाटतं त्यांच्यामुळे मी तारले गेले. ती संस्था जे काही काम करत होती त्यात मला जे हवं होतं ते सापडलं. माझ्या जाणिवा मला तीव्र करता आल्या. माझ्यामध्ये काय आहे ते मला मिळालं. तोपर्यंत मी 'समुद्रावरील खडक' आहे असं मला वाटायचं. पण या संस्थेशी परिचय झाल्यावर वाटलं की पाण्याचे तुषार त्या खडकाच्या छिद्रांतून आत येत आहेत, मला गुदगुल्या करून

म्हणताहेत, ऊठ, किती वेळ अशी पडून राहणार आहेस? नंतर मला जाणवलं की मी पुढे येतं आहे, आनंद लुटते आहे. त्यांची मूल्यं मला महत्त्वाची वाटू लागली.

**आशा साठे** – दीपाताई अत्यंत प्रांजळ आहेत. जोडीदार व आपण यांच्यात गॅप निर्माण होतेय असं जाणवल्यावर काहीतरी अर्ग्युमेंट करत राहणं असं न करता त्या अंतर्मनाकडे वळल्या. त्यांचा आतला प्रवास सुरू झाला. त्याचं दृश्यस्वरूप त्यांच्या शैक्षणिक कार्यात दिसतं. त्यांना केंद्र सरकारची फेलोशिप मिळाली आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रात खूप काम केलं आहे. अजूनही याच धाग्यांनी त्या पुण्यातील अनेक ग्रूपशी जोडलेल्या आहेत. माणसं आतून बदलली पाहिजेत आणि ती शिक्षणानं बदलतील असा त्यांना विश्वास वाटतो. दीपाताई, त्या कामाबद्दल सांगा.
**दीपा श्रीराम** – स्वत:ला शोधणं हाच ह्या कामामागे उद्देश होता. सगळं आपोआप घडत गेलं. जनरल बी.एड.ला ॲडमिशन घेण्यासाठी मी गेले होते, पण ती ॲडमिशन मिळाली नाही. फॉर्म संपले होते. दाते यांच्या संस्थेची तीन सेशन्स होती. मी त्यातली दोन केली आणि दातेंबरोबर काम करायला लागले. नाटकातून गॅप घेतलीच होती म्हणून तन्वीर तीन-साडेतीन वर्षांचा झाल्यावर मी बी.एड. करायचं ठरवलं. पण जनरल बी.एड.ला ॲडमिशन मिळाली नाही. माझ्या मावसबहिणींनी सुचवलं की मी एसएनडीटीला ॲडमिशन घ्यावी. त्याप्रमाणे मी तेथे ॲडमिशन घेऊन बी.एड. इन स्पेशल एज्युकेशन केलं. मी नाटकातही इंटरेस्टेड होतेच. पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचेही कोर्स मी केले होते. असे वेगवेगळ्या प्रकारचे तुकडे माझ्याकडे होते. या सगळ्या चिंध्यांची सुंदर गोधडी कशी करावी या विचारात होते. त्याबद्दल मी दात्यांशी बोलले. 'युज ऑफ ड्रामा टेक्निक इन क्लासरूम' असं काहीतरी करायचं ठरलं.

ड्रामा टेक्निक अशासाठी वापरायचं की त्यातून एखाद्या मुलाला आयुष्याकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन मिळावा. मी काय काय करू शकतो, बरेच काही करू शकतो असा आत्मविश्वास त्याच्याठायी निर्माण व्हावा. त्याला स्वत:चा शोध लागावा. त्यासाठी प्रत्येकाला मदत करायचा तो प्रयत्न होता. मी जे काही करणार आहे त्यात एकसंधपणा आणायचा होता म्हणून त्या दृष्टीनं मी पुढे जात होते.

**आशा साठे** – धारावीच्या झोपडपट्टीत जाऊन तेथील काही स्त्रिया कार्यकर्त्या व्हाव्या म्हणून तुम्ही प्रयत्न केलात. त्या नेत्या व्हाव्या असं तुम्हाला वाटत होतं?
**दीपा श्रीराम** – रूस पारिख ही माझी बी.एड.ची मैत्रीण होती. ती मूकबधिरांसाठीची भाषा शिकली होती. तिनं धारावीत हा प्रकल्प घेतला होता. सातवी-आठवीपर्यंत शिकलेल्या बायकांना टीचर ट्रेनिंग दिलं. बऱ्याच बायका पालक म्हणून सतत तक्रार करत असतात. त्या टीचर झाल्यावर तुम्ही पालकसुद्धा आहात याची जाणीव त्यांना करून दिली.

**आशा साठे** – तन्वीर तुमच्या दोघांच्या जीवनातला आनंद होता. प्रवासात खिडकीतून दगड आला, तो त्याला लागला आणि त्यामुळे त्याचा अंत झाला. तुम्ही आणि डॉ. लागूंनी तो प्रसंग निभावलात. त्यावेळचा तुमचा वेगळा विचार... त्याबद्दल सांगाल?
**दीपा श्रीराम** – त्यातून सावरायला मला श्रीरामनंच मदत केली. तो म्हणाला, 'दुरान्वयानं आपणच या घटनेला जबाबदार आहोत. आपल्या समाजातील गरीब मुलांना दगडफेक करणं हीच एक करमणूक राहिली असेल तर त्याला कोण जबाबदार आहे? आपणच आहोत तर त्यांच्याकडे बोट का दाखवावं? आता आपण काय करू शकतो?'

श्राद्ध वगैरे करणं आम्हाला मान्य नव्हतं. तो आपल्याबरोबर अठरा वर्षे होता याचं आपण सेलिब्रेशन करावं म्हणून त्याचा आम्ही वाढदिवस साजरा करत होतो. २००२ सालापासून 'तन्वीर सन्मान' या नावानं ॲवॉर्ड द्यायला सुरुवात केली.

**आशा साठे** – दीपाताई, त्या घटनेनंतर तुम्ही पुण्याला राहायचा निर्णय घेतला. तुम्हाला पुणं अपरिचित. तुम्ही पुण्याशी नातं कसं जोडलं?
**दीपा श्रीराम** – लहानपणापासून मिसळून जाण्याची वृत्ती आईकडून मिळाली होती. सासरच्या बायका ह्या 'बायका' ह्या लेव्हलवर माझ्यासारख्याच होत्या. आम्ही एक होतो. माझे प्रॉब्लेम त्यांना समजतील असा माझा दृष्टिकोन होता. सासर-माहेर यांतील सीमारेषा मी पुसून काढत राहिले. सासर-माहेर एकमेकांत मिसळून गेलं होतं.

**आशा साठे** – पुण्यात मी शिबिरात काम करत होते तेव्हा मला जाणवलं की आताची तरुण मंडळी बुद्धिमान आहेत पण एकीकडे आपण त्यांच्या वागण्याबद्दल धास्तावलेलोही आहोत. त्यांच्यात काय निर्माण व्हावं असं तुम्हाला वाटतं? त्यांच्यासाठी काय करता येईल?
**दीपा श्रीराम** – मी जेव्हा प्रथम मुलांना शिकवायला गेले तेथपासून मला सुरुवात करायला आवडेल. तेव्हा मला असं वाटायचं की आपण पूर्ण तयारी करून जावं. मुलांच्या साध्यासुध्या कामाचंसुद्धा कौतुक करता यावं. मुलामुलींनी दिलेली छोटी कॉन्ट्रिब्युशनसुद्धा सामावून घेण्याचा प्रयत्न करावा. त्याचं मूल्यमापन करता

यायला हवं. मुलं जे काही विचारतात त्यालाही महत्त्व दिलं पाहिजे. I want to value them. हे मला तिथं जाणवले, की युजिंग देअर व्हॉईस अ‍ॅन्ड युजिंग देअर बॉडी कसं करता येईल? नाट्यक्षेत्रात त्याचा उपयोग काय हे मी त्यांना सांगत असे.

**आशा साठे –** स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्या, अत्यंत हुशार मुलांच्या शिबिरात तुम्ही जाता आणि तेथे ड्रामा टेक्निक वापरता. त्याचा काय उपयोग होतो? तुम्ही ते टेक्निक कसं वापरता?

**दीपा श्रीराम –** मी त्यांना सांगते, की ह्या सेशनमध्ये आपल्या आयुष्यात काय मिळवायचं ते आपण ठरवू शकतो. ते स्वत:ला मान देऊ लागले, आपल्या मनात जे आहे ते मांडू लागले, त्यांच्यात आत्मविश्वास आला तर आपण काहीतरी अचिव्ह केलं आहे याचा आनंद मिळतो तो महत्त्वाचा आहे. शेवटी मी त्यांना विचारते की तुम्हाला कुणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करायची आहे का?

ज्यांनी मला बोट धरून पुढे पुढे नेलं आहे, ते हात मला दिसतात. ज्यांच्या खांद्यांचा आधार मिळाला ते खांदे दिसतात. त्यांच्याबद्दल मला कृतज्ञता वाटते. आयुष्यानं आपल्याला भरभरून दिलं आहे. ते ओळखण्याची आणि त्याचा उपयोग करण्याची आपली लायकी असायला हवी असा विचार मी त्यांना देते. आयुष्य सतत संधी देत असतं, तुम्ही ती संधी कशी घेत आहात यावर तुमची प्रगती अवलंबून असते.

**प्रेक्षकांकडून प्रश्न –** १. चर्चेमध्ये एक मुद्दा अर्धवट राहिला. दुबे, पालेकर आणि श्रीराम लागू या तिघांच्या दिग्दर्शनाची वैशिष्ट्यं कोणती जाणवली?

**दीपा श्रीराम –** तिघंही आमच्या कामात लुडबूड करायचे नाहीत. आम्हाला मोकळं रान द्यायचे. 'गोची' या नाटकासाठी पालेकरांनी मला विचारलं. आधी ते काम ज्युईली देऊस्कर करत असत. पण माझं त्या भूमिकेचं इंटरप्रिटेशन वेगळं होतं. मी अमोलला तसं विचारलं. म्हटलं, 'मी फार वेगळं करते आहे का?' तो म्हणाला, 'तू करते आहेस ते फार ऑफ बॅलन्स जातंय असं मला वाटलं तर मी सांगेन. नाहीतर ठीक आहे.'

**शब्दांकन**
**शर्मिला पिटकर**


## 'ग्रंथाली'चे ताजे प्रकाशन




**मूल्य सवलतीत १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

प्रतीक्षा करणाऱ्या आम्हा सर्वांना गेटच्या बाहेर काढण्यात आले. निकाल चार–पाच नोटिस बोर्डांवर लावल्यानंतर गेट उघडण्यात आले. मोठा कोलाहल झाला व निकालासाठी ताटकळत बसलेले सर्वजण नोटिस बोर्डांवर मधमाशांसारखे जाऊन चिपकले. मी बोर्डासमोर उभ्या असलेल्या मुलांच्या कंबरांमधून जागा करून माझे मुंडके मध्ये घुसवले आणि मान वर करून तालिकेकडे बघू लागलो. तालिकेत माझे नाव बघितले तेव्हा माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसला नाही. माझ्या हृदयाचे ठोके काही सेकंदांसाठी बंद झाले! तालिकेत दिसणाऱ्या माझ्या रँकवरून मला आय.ए.एस. मिळणार हे निश्चित झाले होते. जे मी अनुभवत होतो त्यावर माझा विश्वास बसत नव्हता. मी घरी आतुरतेने वाट बघत असलेल्या स्मिताला आणि नंतर माझ्या माऊलीला– ताईला– आनंदाची बातमी कळवण्यासाठी उतावीळ झालो होतो. त्यांना फोन करतोपर्यंत माझा कंठ दाटून आला होता व डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले होते. ताईने फोन उचलताच मी जोराने ओरडलो, ''ताई, मी कलेक्टर व्हयनू!''

# ‘कृतार्थ’ मुलाखत
# वसंत सरवटे

‘कृतार्थ’ मुलाखतमालेत २० सप्टेंबर रोजी, प्रसिद्ध व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांच्या मुलाखतीचे पुष्प गुंफले गेले.

सुरुवातीला ‘निशाणी-डावा अंगठा’ पुस्तकाला मॅजेस्टिकचा ‘जयवंत दळवी’ पुरस्कार मिळाल्याबद्दल या पुस्तकाचे लेखक रमेश इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी इंगळे म्हणाले, ‘‘आपण जे लिहितो ते ग्रंथालीतर्फे छापले जावे अशी माझी इच्छा होती. मी गांगलांसमोर हस्तलिखित ठेवले. त्यांना विषय सांगितला. अक्षरश: दीड-दोन तास मी बोलत होतो. मी त्यांना म्हणालो, हे सगळं सगळं कादंबरीत मांडलेलं आहे. ते म्हणाले, ‘‘तू जसं बोललास, आता माझ्यासमोर मांडलंस, तसंच्या तसं कादंबरीत आलं असेल तर मी तुझी कादंबरी आजच स्वीकारली आहे. मला वाटतं, कोणत्याही लेखकाला प्रकाशका-कडून असे शब्द क्वचितच ऐकायला मिळत असतील. गांगल म्हणाले की तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी एक महिना लागेल आणि खरोखर महिन्याच्या तिसाव्या दिवशी मला ग्रंथालीकडून पत्र आलं की आम्ही ही कादंबरी छापणार आहोत. लवकरच ती प्रकाशित झाली. कादंबरीला जी लोकप्रियता मिळाली त्यात माझ्याइतकाच ग्रंथालीचाही सहभाग आहे. आज एका कृतार्थ आयुष्याच्या हस्ते माझा सत्कार होतो आहे याचा मला आनंद होत आहे. हा अपूर्व योग आहे.’’

या सत्कारानंतर सरवटे यांच्या मुलाखतीला प्रारंभ झाला. व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी व अवधूत परळकर यांनी मुलाखत घेतली. प्रशांत कुलकर्णी यांनी अनेक दिवाळी अंकातून व्यंगचित्रे काढली आहेत. सध्या ते ‘लोकसत्ता’मध्ये कार्यरत आहेत. मुलाखती-बरोबरच सरवट्यांची काही चित्रेही स्लाईडद्वारे दाखवली गेली.




**‘निशाणी डावा अंगठा’ या पुस्तकाला मॅजेस्टिकचा जयवंत दळवी पुरस्कार मिळाल्याबद्दल लेखक रमेश इंगळे-उत्रादकर यांचा वसंत सरवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

**प्रशांत कुलकर्णी –** वसंत सरवटे यांचं वय ब्याऐंशी वर्षांचं आहे. त्यांची कारकीर्द जेवढ्या वर्षांची आहे त्यापेक्षा माझं वय कमी आहे. त्यांचं विविध प्रकारचं इतकं काम आहे की ते करणं सोडाच, पण नुसतं पाहून होणं-सुद्धा कठीण आहे.

मला त्यांच्या चित्रांमध्ये एक समान धागा जाणवतो तो म्हणजे कोल्हापूर. म्हणून कोल्हापूर ते मुंबई हा त्यांचा प्रवास आपण जाणून घेऊया. साठ-सत्तर वर्षांपूर्वीचं कोल्हापूरचं वातावरण आणि मुंबईपर्यंतचा तुमचा प्रवास याबद्दल आपण सांगाना!

**वसंत सरवटे –** कोल्हापूरला मी साठ-सत्तर वर्षांपूर्वी होतो. जन्म आणि अठरा वर्षापर्यंतचं शिक्षण कोल्हापुरातच झालं. माझ्यावर कोल्हापूरच्या वातावरणाचे संस्कार झाले. मी स्वस्थ बसतो तेव्हा त्या काळच्या आठवणी येतात. त्यावेळी ते कोल्हापूर नव्हे तर कलापूर होतं. कला-क्षेत्रातील, साहित्यक्षेत्रातील मोठमोठी माणसं तिथं राहत होती. माधवराव बागल, वि.स. खांडेकर राहात. संगीतातील अल्लादियाँ खाँ होते. दोन चित्रपट स्टुडिओ तेव्हा कोल्हापुरात होते. अशा ठिकाणी माझं बालपण गेलं. चित्रकलेचे संस्कार माझ्यावर जास्त झाले. सकाळी कपालतीर्थ मंडईत दररोज दोन-तीन तरुण स्केचिंग करताना दिसत. लँडस्केप हे कोल्हापूरच्या चित्रकारांचं वैशिष्टच. कोल्हापूरला निसर्गसौंदर्याचं वरदान लाभलं आहे. माझ्या त्या संस्कारक्षम वयात मला चित्रकलेची गोडी लागली. मी बारा-तेरा वर्षांचा असल्यापासून स्केचेस काढत असे. चित्रकार शि.द. फडणीस माझ्याबरोबर असत. आम्हाला वाटायचं की दोघांनी मिळून मुंबईला जावं आणि जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकावं. ते आमचं स्वप्न होतं.

मी मॅट्रिक पास झाल्यावर मला चित्रकार व्हायला आवडलं असतं पण घरच्यांचा त्याला पाठिंबा नव्हता. हे उपजीविकेचं साधन होऊ शकत नाही असे त्यांना वाटत होतं. मी अभ्यासात हुशार होतो. मला गणित चांगलं जमत असे. त्यामुळे

चित्रकार होण्यापेक्षा मी उच्चशिक्षण घ्यावं अशी घरच्यांची इच्छा होती म्हणून मी इंजिनीयर व्हायचं ठरवलं.

**प्रशांत कुलकर्णी–** व्यंगचित्रकलेचे संस्कार तुमच्यावर करवीरनगर वाचनालया-तील मासिकांमुळे झाले. त्याविषयी थोडं सांगा.

**वसंत सरवटे –** करवीरनगर वाचनालय ही उत्कृष्ट लायब्ररी होती. तिला संस्थानाची मदत होती. ना.सी. फडके त्या लायब्ररीचे अध्यक्ष होते. ते त्यांना आवडणारी उत्तमोत्तम पुस्तकं लायब्ररीसाठी आणत. तेथे 'स्ट्रॅण्ड' नावाचं प्रसिद्ध इंग्रजी मासिक येत असे. त्यातील चित्रं पेंटिंगच्या कुवतीची असत. एक अमेरिकन साप्ताहिक येत असे त्यात बरीच व्यंगचित्रं असत. लिलीपुट आणि मेन ओन्ली या मासिकांतही चांगली व्यंगचित्रं असत. एका साप्ताहिकात दलालांची व्यंगचित्रं येत. मला दलालांच्या चित्रांनी मोहिनी घातली. त्यांचा आदर्श मी माझ्यासमोर ठेवला. काही दिवसांनी माझ्या लक्षात आलं की बरीचशी मासिकं व्यंगचित्र छापतात. मी कॉलेजमध्ये असताना, म्हणजे पंधरा-सोळा वर्षांचा असताना किर्लोस्कर मासिकानं माझी व्यंगचित्रं छापली. अशा तऱ्हेनं मी व्यंगचित्रांकडे वळलो ते चित्र छापून येण्याचा सोपा मार्ग म्हणून वळलो.

मुंबईत 'हंस' नावाचं मासिक अनंत अंतरकर काढत असत. त्यांच्याकडे मी व्यंगचित्र पाठवलं तेव्हा मी इंजिनीयरिंगच्या पहिल्या वर्षाला होतो. एक दिवस घरी आलो तर पोस्टमन माझी वाट पाहत होता. म्हणाला, ''साहेब, तुमची मोठी मनीऑर्डर आहे.'' पाहिल्यावर लक्षात आलं की मोठी म्हणजे किती तर दोन रुपयांची! तो मोबदला होता त्या काळातला! तेव्हा दोन रुपये म्हणजे कमी नव्हते. त्यांनी मनीऑर्डरमध्ये खाली लिहिलं होतं, ''तुम्ही अशी चित्रं आमच्याकडे पाठवता जा.''

इंजिनीयरिंगला मी पहिल्या वर्षी पास झालो आणि मला 'प्लुरसी'सारखा रोग झाला. त्या काळात अशा आजारावर अँटिबायोटिक्स नव्हती. त्या रोगाला क्षयाची भावना मानलं जात असे. मोठा वेळ घेणारा आजार होता तो! त्यामुळे माझं ते वर्ष वाया गेलं. त्यानंतरचंही एक वर्ष गेलं. ती दोन वर्षे मी कोल्हापुरातच राहिलो. त्या काळात मी चित्रकलेकडे जास्त लक्ष दिलं. इंजिनीयरिंगची मला आवड नव्हतीच त्यात हे आजारपण. मी लँडस्केप, व्यंगचित्र, स्केचिंग याला सुरुवात केली. तेथे माझं चित्रकाराचं करिअर सुरू झालं. दोन वर्षं मला मिळाली. त्यानंतर पुन्हा इंजिनीयरिंगला गेलो, पण त्यामुळे मी इंजिनीयर व चित्रकार या दोन्ही गोष्टी करू शकलो.

**प्रशांत कुलकर्णी –** तुम्ही नोकरीनिमित्त कोल्हापूरहून मुंबईला आलात. मुंबई हे कलागुणांना वाव देणारं शहर आहे. इथं आल्यानंतर तुम्हाला जीवनशैलीत खूप बदल जाणवला असेल. तो बदल तुमच्या व्यंगचित्रातूनही दिसतो.

**वसंत सरवटे –** खूपच बदल जाणवला. त्यावेळचं पन्नास-साठ वर्षांपूर्वीचं कोल्हापूर हे छोटंसं, आटोपशीर गाव होतं. प्रत्येक माणूस प्रत्येकाला ओळखत होता. प्रत्येकाला स्वत:ची आयडेंटिटी होती. भालजींचा चित्रपटस्टुडिओ तिथं होता त्यामुळे अनेक प्रसिद्ध नट आम्हाला सहज दिसायचे. मा. विठ्ठल या मोठ्या नटाला अनेक वेळा भाजी आणण्यासाठी मंडईत आलेला पाहिला आहे. त्यावेळी आम्हाला विठ्ठलांचं मोठेपण माहीत नव्हतं. अशा अनेक थोर माणसांशी आमचे जवळचे संबंध होते.

एका चित्रात एक भाजीवाला आहे. भाजी घ्यायला टिपिकल कोल्हापुरी ड्रेस घातलेला एक गृहस्थ आला आहे. भाजीवाला त्याला म्हणतो, ''काय साहेब, मा. विठ्ठलसाहेब केव्हाच भाजी घेऊन गेले. शूटिंग आहे म्हणून आणि तुम्ही कॅमेरामन अजून इथंच होय!'' म्हणजे हे सगळं घरच्यासारखं चालायचं.

**प्रशांत कुलकर्णी –** तुम्ही कोल्हापूरबद्दल इतकं बोलता पण तुमच्या व्यंगचित्रांत कोल्हापूर कमी आणि मुंबई जास्त दिसते.

**वसंत सरवटे –** हे खरं आहे. मी कोल्हापूरच्या शांत, संथ वातावरणातून मुंबईला आलो. कोल्हापूरला वेळेचं काही बंधन नसायचं. एका व्यंगचित्रात मी असं दाखवलं आहे, की एक गृहस्थ एका परिटाकडे गेला. ते दुकान बंद होतं. शेजारचा दुकानदार म्हणतो, ''हा बापू गावाला गेलाय बहिणीचं लग्न आहे म्हणून. आता दहा दिवस येणार नाही.'' कपडे घेऊन आलेला माणूस म्हणतो, ''ठीक आहे. ठीक आहे.'' म्हणजे त्या माणसालाही दहा दिवस थांबावं लागेल याचं काही वाटत नाही. त्याला वेळेचं बंधन नाही.

त्याउलट दुसऱ्या चित्रात असं दिसतं- मुंबईतील एक लाँड्रीवाला आहे. गिऱ्हाईक बनियन घातलेला आहे. लाँड्रीवाला म्हणतो, ''देतो ना लगेच तुमचे कपडे. कुठे बसणार तुम्ही गाडीत? महालक्ष्मीला की बॉम्बे सेंट्रलला?'' कोल्हापूर आणि मुंबईतील कल्चरचा हा फरक आहे. मुंबईची प्रचंड गर्दी, प्रत्येक गोष्ट वेळेत झाली पाहिजे यावरची माझी प्रतिक्रिया माझ्या चित्रांत दिसते. कोल्हापुरातील परस्परातील नात्याचं, जिव्हाळ्याचं जीवन आणि मुंबईतील यांत्रिक, घड्याळावर बांधलेलं जीवन याची तुलना माझं मन नेहमी करतं. ती तुलना माझ्या चित्रांत दिसते. मी कोल्हापूरवर जसं प्रेम केलं तसं मुंबईवर कधीही केलं नाही.

मुंबईचं जीवन दाखवणारं एक चित्र आहे. त्यात मी लोकलमधील गर्दी, एकमेकाला चिकटलेली माणसं, श्वास घ्यायलासुद्धा जागा नाही. अशात एक गृहस्थ अस्वस्थ होऊन वरची कडी उगाचच वाजवतो. शेजारचा गृहस्थ त्याला सांगतो, ''तुम्ही, मोटार घेणार लवकरच. तुमच्या

हातावरची रेषाच सांगते.'' त्यावेळी त्या कडी वाजवणाऱ्या गृहस्थाला दिलासा मिळाला असेल.

**प्रशांत कुलकर्णी –** सरवटेंनी एक मोठं काम केलं. अनेक दिवाळी अंकांत व्यंगचित्रं काढायला सुरुवात केली. त्यांनी व्यंगचित्र-मालिका हा प्रकार सुरू केला. प्रत्येक मालिका म्हणजे एक कादंबरीच आहे. 'सहनाववतु सहनौभुनक्तु' या मालिकेत त्यांनी पाच-सहा चित्रांतून एक संस्कृती व्यक्त केली आहे.

**वसंत सरवटे –** कोणतंही चित्र पाच-सहा मिनिटांत पाहून होत नाही. त्यातील तपशील, दृश्यगट पाहून त्याचा अर्थ लावावा लागतो. ते पाच मिनिटांत होणं कठीण असतं. 'ललित'नं माझ्यावर एक अंक काढला होता. त्याच्या मुखपृष्ठावर माझंच व्यंगचित्र काढलं आहे. त्यात एका बाजूला माझा फोटोग्राफ आहे. त्या व्यंगचित्रात माझं- चित्रकार आणि इंजिनीयर – असं दुहेरी व्यक्तिमत्त्व दाखवलं आहे. त्यात चित्रकार जो आहे त्यासाठी एक रेषा काढली आहे. त्या रेषेतून चौकट बनते. त्या चौकटीत तो इंजिनीयर बसवला आहे. एका फुलाआडून एक माणूस बघत आहे. चौकटीबाहेर जे चित्र आहे त्यात मुंबईच्या इमारती, गर्दी, लोकलचा प्रवास दिसतो.

दोन इमारतींमध्ये एक तार आहे. त्या तारेवर दाटीवाटीने पक्षी बसले आहेत. वजनामुळे तार वाकली आहे. मुंबईची यांत्रिक संस्कृती व पक्ष्यांच्या रूपानं निसर्गाचा प्रवेश आहे. वाकलेल्या तारेमुळे माझ्यातील इंजिनीयर जागा झाला. मला त्यात डिफ्लेक्शन दिसलं म्हणून त्यासंबंधीचा फॉर्म्युला तिथं लिहिला आहे. पक्ष्यांच्या रूपानं निसर्गप्रेमी चित्रकार आणि डिफ्लेक्शनमुळे माझ्यातील इंजिनीयर ह्या व्यंगचित्रात दिसतो.

**प्रशांत कुलकर्णी –** सरवटे यांची एक व्यंगचित्रमालिका आपण पाहू. तिचे नाव आहे 'सहनाभवतु, सहनौभनुक्तु.' (पडद्यावर दृश्यं दिसतात.)

पहिलं चित्र शंभर वर्षांपूर्वीच्या जेवणपद्धतीचं आहे. पंगतीत वयानुसार पहिल्या जागेवर सर्वात ज्येष्ठ व्यक्ती, आजोबा, पणजोबा वगैरे आणि अगदी लहान मुलगा सर्वात शेवटी. वाढणारी बाई म्हणजे काकू, आई, आजी वगैरे माजघराच्या दाराआड, हातात तुपाची तांबोली घेऊन उभी आहे. मागे एक कोनाडा आहे. पंगतीत प्रत्येकाच्या बाजूला तांब्याभांडं आहे. मोठे पुरुष सोवळं नेसले आहेत. चुलीजवळ असलेल्या बाईनं पांढरं किंवा लाल लुगडं नेसलं आहे.

दुसऱ्या चित्रात चूल आहे पण नवराबायको व मुलं जमिनीवर बसून जेवत आहेत. कोणीही सोवळं नेसलेलं नाही. चुलीजवळ एक पितळेचा कूकर आहे. नवरा-बायको यांच्यात काहीतरी संवाद चालू आहे. जो पहिल्या चित्रातील शंभर वर्षांपूर्वीच्या कुटुंबात नव्हता.

पुढील चित्रात चाळीस वर्षांपूर्वीचं कुटुंब आहे. हे कुटुंब डायनिंग टेबलावर जेवत आहे. कुटुंबप्रमुख सगळ्यांशी हास्यविनोद करत आहे. बाई नोकरी करत नसावी. ती उभी राहून वाढतं आहे.

त्या पुढच्या चित्रात कुटुंबातील सगळेजण एका पातळीवर आहेत. कोणीच कोणाला वाढत नाही. खाद्यपदार्थांची देवघेव चालू आहे. दोन मुलं आहेत. जेवणापेक्षा करमणुकीला जास्त महत्त्व देत आहेत.

**वसंत सरवटे –** हे चित्र विचाराला प्रवृत्त करणारं आहे. एखादा मजकूर शब्दातून सहजपणे समजतो कारण आपल्याला लहानपणापासून तशी सवय असते. पण चित्रातील दृश्य तपशील पाहून, ते एकमेकांशी जोडून त्यातील अर्थाचा आस्वाद घ्यायचा तर त्यासाठी वेगळं कौशल्य संपादन करावं लागतं. चित्रातील तपशील हा त्याचा अर्थ जास्त स्पष्ट करत असतो. चांगल्या चित्राचं हे लक्षण आहे असं मला वाटतं.

**प्रशांत कुलकर्णी–** सरवटे यांनी ज्या काही व्यंगचित्रमालिका केल्या आहेत. त्या मी केरळमधील व्यंगचित्रकारांना दाखवल्या. अशा प्रकारची व्यंगचित्रं किंवा हास्यचित्रं असतात याची कल्पनाही त्यांना नाही. म्हणजे मराठी व्यंगचित्रकला खूपच प्रगत आहे असं मला वाटतं.

**वसंत सरवटे –** व्यंगचित्रातून खिडकी, चप्पल, कात्री अशा निर्जीव वस्तूंतून मानवी भावना व्यक्त होतात. कोल्हापुरी चपलांचं असंच एक व्यंगचित्र आहे. कोल्हापुरी चपला या विशिष्ट प्रकारच्या असतात. त्या चपला एकमेकींशी त्या चित्रात बोलत आहेत. एक दुसरीला म्हणते, ''आपुन खूप हिंडलो, अमेरिकेत गेलो, मॉस्कोत गेलो पण कोल्हापुरातल्या कोल्हापुरात असूनही आपल्याला अंबाबाईचं दर्शन नाही होत बघा.''

**प्रशांत कुलकर्णी –** च आणि ज या अक्षरांना तुम्ही एका चित्रात व्यक्तिमत्त्व दिलं आहे ते कसं?

**वसंत सरवटे –** च आणि च्य असा 'च'चा दोन प्रकारे उच्चार फक्त मराठी माणूसच करतो. उदाहरणार्थ 'चहाच' या शब्दात पहिला 'च' 'चा' उच्चार 'च्य' असा आणि शेवटचा च असा केला जातो. तेच 'ज'च्या बाबतीतही आहे.

एका व्यंगचित्रात च आणि ज भेटतात रस्त्यात. 'च' 'ज'ला म्हणतो ''मी आहे च्य. तुझ्या 'च'चा जुळा भाऊ.'' यात भाषेचा, आवाजाचा, चित्राचा परस्परांशी संबंध जुळला आहे.

**प्रशांत कुलकर्णी–** सरवटे कलेकडे वैचारिक अंगानं बघतात. ते वैचारिकतेचं शेवटचे टोक गाठतात. आपण अलिकडे राहतो आणि ते पलिकडे निघून जातात. तसं एक चित्र त्यांनी 'ललित'च्या मुखपृष्ठावर काढलं होतं. ते आपल्याला बुचकळ्यात टाकते. मला त्यांना प्रश्न विचारावासा वाटतो



**वसंत सरवटे यांनी स्लाईड-शोद्वारा चित्रं उलगडून सांगितली.**

की अशी व्यंगचित्रं असावीत का? की त्यात लोकभिमुखता असावी?

**वसंत सरवटे –** कठीण, सोपं असं काही कलेत नसतं. लोकाभिमुख, लोकप्रिय, सोपी कलाकृती करणं हेही कठीणच असतं. योगायोगानं म्हणा, सुदैवानं म्हणा मला जसं सुचतं तसं मी करतो, जाणुनबुजून करत नाही. एका स्टेजला माझ्या लक्षात आलं की आपण रेखाटलेलं चित्र कधी कधी कळत नाही पण कलाकृतीबद्दल असं काही सोपं, कठीण असं नसतं. चित्र समोर असतं ते रेषा, रंग यातून बोलतं. ललितसाठी मी अनेक वर्षं मुखपृष्ठ केलं. ते साहित्याला वाहिलेलं मासिक आहे. साहित्यिक जगातील विषय त्यात यावे अशी अपेक्षा असते. स्टॉलअपीलचा प्रश्न नसावा. त्यामुळे मी तशी मुखपृष्ठं केली. अनेक वेळा ती लोकांच्या डोक्यावरून गेली. काहींना ती कळली नाहीत वगैरे वगैरे.

माझ्या एका व्यंगचित्राला ऐतिहासिक महत्त्व आहे. पु.ल. देशपांडे यांना ज्यावेळी महाराष्ट्रभूषण पुरस्कार मिळाला तेव्हा त्यांनी असं एक विधान केलं की, ''लोकांच्या मता-वर तुम्ही निवडून येता आणि लोकशाहीला नावं ठेवता हे बरोबर नाही.'' यावर खूप गदारोळ झाला. काही नेत्यांनी 'हे काय आम्हाला शिकवणार' असं म्हटलं. मला वाटतं तुम्हाला पुलंचं विधान मान्य नाही तर त्याचा योग्य शब्दात प्रतिवाद करू शकता पण तुम्ही सहिष्णू असणं हा महत्त्वाचा भाग आहे. हा संदर्भ घेऊन काढलेल्या त्या व्यंगचित्रात एक विदूषक फार अवघड अवस्थेत आहे. त्याच्या तोंडाला प्लॅस्टर मारले आहे. त्यामुळे तो बोलू शकत नाही. तो अवघडलेल्या अवस्थेत आहे कारण जनतेनं त्याची विजार काढून घेतली आहे. हा जनतेचा मोर्चा विजयाच्या घोषणा देत आहे, पण त्या जनतेला डोळे नाहीत! काही अंतरावर तीन-चार माणसं बघताहेत. त्यांना वाटतंय की हे जे चाललं आहे ते समाजाच्या दृष्टीनं वाईट आहे पण ते काही करू शकत नाहीत. कारण त्यांना डोळे आहेत पण तोंड नाही.

असा हा जो संदर्भ आहे ना तो तपशील पाहिल्याशिवाय कळणं कठीण आहे.

**प्रशांत कुलकर्णी–** तुम्ही 'बटाटयाची चाळ' या पुस्तकासाठी काढलेल्या व्यंगचित्रात थेट रेखाटन केलं आहे. त्या चित्राची वैशिष्ट्यं काय आहेत?

**वसंत सरवटे –** पुलंनी चाळीचं वर्णन केलेलं नाही. मला चाळीचा अनुभव आहे. मी चित्रात खिळखिळे लाकडी जिने, वसईवाला दूधवाला, वॉचमनचं झोपडं, त्याच्या पत्र्यावर मांजर असं सगळं रेखाटलं आहे. चाळीशेजारी एक झाड आहे ते चाळीइतकंच जुनं आहे. झाडाजवळ उभे आहेत ते पु.ल. आहेत. त्यांच्याशेजारी एक मांजर आहे. पुस्तकात नसलेलं वर्णन त्या चित्रात आहे.

**प्रशांत कुलकर्णी –** विंदा करंदीकरांच्या 'राणीचा बाग' पुस्तकासाठी आपण चित्रं काढली आहेत.

**वसंत सरवटे –** होय. विंदाच्या कवितेत खेळकर वातावरण आहे. वाघ, सिंह मुलांशी खेळतात. कवितेत काही शब्दांचं वर्णन नाही तो तपशील मी चित्रात घातला. विंदांनी त्या चित्रासंबंधी म्हटलं ''कविता कुठे संपते आणि चित्र कुठे सुरू होते हे कळत नाही इतकी ती कवितेशी एकजीव झाली आहेत.'' त्यांची 'मैफल' नावाची कविता आहे. त्यासाठी काढलेल्या चित्रात 'झुरळ' शास्त्रीय गायक झालं तर मांजर श्रोता म्हणून आलं आहे म्हणून त्याच्या गळ्याभोवती मफलर आहे. विंदांनी जे शब्दात म्हटलं ते मी चित्रात तपशीलवार दाखवलं. एकाच वेळी मुलांच्या कानांना व डोळ्यांना आनंद मिळतो.

**प्रशांत कुलकर्णी–** माधव मनोहरांनी 'राणीचा बाग' ह्या विंदांच्या पुस्तकाविषयी म्हटलं आहे, ''करंदीकरांच्या ह्या कविता खास लहान मुलांसाठी आहेत. त्यातील अर्थ खुलवण्यासाठी वसंत सरवटे यांनी जी चित्रं रेखाटली आहेत तीसुद्धा अपूर्वच आहेत. आपल्या कवितांतील पशुपक्ष्यांना करंदीकरांनी स्वभाव दिले आहेत तसेच सरवट्यांनी त्यांना रंगीबेरंगी वेश दिले आहेत. ही वेशभूषा पुन्हा अशी की त्यातून त्या त्या पशुपक्ष्याचे स्वभावही व्यक्त होतील. ही राणीची बाग पाहिली की असं वाटतं ह्या सर्वांगसुंदर पुस्तकातील गाण्यांचं आकर्षण किती आणि चित्रांचं आकर्षण किती? कारण

यातील कवितांत चित्रे आहेत आणि चित्रात कविता आहेत.''

**वसंत सरवटे –** विंदांच्या दुसऱ्या कवितेत पाहुण्यांचं गमतीदार वर्णन आहे. पाहुणे येतात तेव्हा घरातल्या मुलांना उत्सुकता असते की ते आपल्यासाठी काय आणणार? वेगवेगळ्या गावांतून येणाऱ्या पाहुण्यांचा खाऊ वेगवेगळा असतो. विंदांनी म्हटलं आहे– ''सोलापूरहून येते काकू। माझ्यासाठी आणते चाकू। कोल्हापूरहून येते आत्ते। माझ्यासाठी आणते पत्ते। राजापूरहून मावशी येते। माझा एक पापा घेते।।

या कवितेतील मेख अशी की देशावरून येतात ते नातेवाईक काही ना काही घेऊन येतात, पण कोकणातून येणारे पाहुणे काहीच आणत नाहीत!

या कवितेसाठी काढलेल्या चित्रातील मावशी नऊवारी नेसली आहे. तिनं येताना सतरंजीची वळकटी आणि पत्र्याची ट्रंक आणली आहे आणि त्याबरोबर खराटा आणि फणस आणला आहे असं दाखवलं आहे. हा तपशील कवितेत नाही पण चित्रातील तपशीलामुळे तो प्रसंग डोळ्यांसमोर येतो.

तेंडुलकरांचं 'शांतता, कोर्ट चालू आहे' हे नाटक आहे. त्यात आदिमानवा-पासून माणसामध्ये असलेली हिंसा व क्रौर्य अजूनही तसेच आहे ते न्यायाधीशाचं स्वरूप घेऊन ह्या नाटकात आलं आहे. ते चित्रात दाखवलं आहे.

जयवंत दळवींच्या विनोदाची जात आपल्याला माहीत आहे. त्याबरोबर त्यांचं माझ्याविषयीचं प्रेमही माहीत आहे. एका चित्रात मी ते प्रेम दाखवलं आहे. त्या चित्रात दळवी विविध प्रकारचे मासे खात बसले आहेत. समोर फिशपॉंड आहे. त्यात मासे आहेत ते म्हणताहेत, ''आता पुरे झालं!''

यानंतरचं चित्र पुन्हा पुलंच्या वक्तव्याच्या आधारे आहे. आणिबाणीच्या काळात पुलंनी अनेक प्रकारे टीका केली तेव्हा यशवंतराव चव्हाण म्हणाले, ''आम्ही राजकारण्यांनी कसं वागावं हे विदुषकानं शिकवण्याची गरज नाही.''

नंतर पुलंचं 'खिल्ली' हे पुस्तक प्रसिद्ध झालं. त्याचं मुखपृष्ठ मी केलं. 'खिल्ली' या अक्षरांवर विदुषकाची टोपी आहे आणि तो विदूषक राजकारण्याची टोपी उचलतोय. त्याचं सत्ता मिळवण्याचे जे स्वप्न आहे त्याचा फुगा पंक्चर करून तो फोडतो.

यानंतर दिसणारं चित्र 'आणखी ठणठणपाळ' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील आहे. त्यात ठणठणपाळ पहिला हातोडा टाकून नवीन हातोडा घेत आहे.

**प्रशांत कुलकर्णी–** आता अर्कचित्रं सुरू झाली आहेत. त्यातून कशी व्यक्तिमत्त्वं उभी राहतात? ती समजण्यासाठी चित्र-साक्षरतेची गरज आहे असं म्हटलं जातं. ही चित्रसाक्षरता म्हणजे काय?

**वसंत सरवटे –** अक्षर हे चिन्ह आहे. ते चिन्ह ज्याला समजतं तसा आवाज करतो. त्याला आपण साक्षर म्हणतो. ज्याला ती चिन्हं कळत नाहीत तो निरक्षर असं आपण म्हणतो. चित्रांच्या बाबतीतही तसंच आहे. चित्राची भाषा, चित्राची चिन्हं वेगवेगळी आहेत. त्यात रेषा आहेत, रेषेची अनेक रूपं आहेत. रंग आहे, पोत आहे. हे समजून घेणं म्हणजे चित्रसाक्षरता!

**प्रशांत कुलकर्णी–** व्यक्तिमत्त्वातील नेमकं मर्म चित्रात आणणारी चित्रं कशी असतात? अर्कचित्र म्हणजे काय?

**वसंत सरवटे –** अर्कचित्र म्हणजे त्या व्यक्तिमत्त्वाचा अर्क रेषांमधून व्यक्त करणं. दळवींच्या 'ठणठणपाळ'साठी मी साहित्यिकांची अर्कचित्र काढली आहेत. त्यात ग.दि. माडगूळकरांचं एक अर्कचित्रं आहे. ज्यांना त्यांचा स्वभाव माहीत आहे त्यांना ते समजेल. ते राग आला की हातवारे करत जोरदारपणे बोलायचे. त्या चित्रात मी तसं दाखवलं आहे. त्याउलट स्वभाव श्री.पु. भागवतांचा. ते शांतपणे, सावकाश बोलत. थोड्या शब्दांत आपला विचार व्यक्त करत. माडगूळकरांच्या चित्रात त्यांचे हातवारे आहेत, तर श्रीपुंच्या बोटांमधून त्यांचं व्यक्तिमत्त्व व्यक्त झालं आहे.

**प्रशांत कुलकर्णी–** ज्यांची अर्कचित्रं तुम्ही काढलीत त्यांच्या प्रतिक्रिया काय असायची? कोणी रागावलं वगैरे?

**वसंत सरवटे –** मागे वळून बघताना असं वाटतं, की मी कोणत्याही चित्रात कधीच कोणाची टिंगल केली नव्हती. राजकारणी लोकांची चित्रं काढताना थोडा भावनेचा भाग असतो. तसा काही प्रश्न साहित्यिकांची चित्रं काढताना नव्हता. त्यामुळे कोणी चिडण्याचा प्रश्न नव्हता. उलट, काही साहित्यिकांना वाटायचं की आपलंही असं चित्र यावं. एकदा पुंडलिक मला म्हणाले होते, ''पुढच्या वेळी माझं चित्र यायला पाहिजे.''

**प्रशांत कुलकर्णी–** तुमचा वावर साहित्यिकांमध्ये पुष्कळ होता. तुमचं पर्यावरण साहित्याचं होतं. त्यामुळे तुमच्या चित्रात जसा मुंबईचा प्रभाव पडला तसा साहित्यक्षेत्राचाही पडला. साहित्यिकांची खट्याळपणे रेवडी उडवणं, त्यांचे एकमेकांशी असलेले व्यवहार वगैरे विषय कोणा व्यंगचित्रकारानं फारसे हाताळले नाहीत. ते तुम्ही हाताळले असं मला वाटतं. हे साहित्याच्या ओढीमुळे झालं की साहित्यिकांच्या सलगीमुळे?

**वसंत सरवटे –** मी व्यंगचित्राकडे वळलो ते साहित्याच्या आवडीतून. पुढे मुंबईत आल्यावर साहित्यिकांशी माझी मैत्री झाली. ललितच्या परिवाराशी संबंध आल्यामुळे साहित्यवर्तुळातील अंतर्गत व्यवहार मला कळले. राजकारणापेक्षा फारसं वेगळं असं तिथं काही नसतं, पण आपल्याला ते कळत नाही. मला ते कळल्यामुळे माझ्या कामात त्याचं प्रतिबिंब पडलं.

**प्रशांत कुलकर्णी –** विनोदी लेखकांच्या पुस्तकांना तुम्ही मुखपृष्ठ केलीत.

मग विनोदी लेखन का नाही केलं?

**वसंत सरवटे –** मी लेखन करायचा प्रयत्न केला होता. तुम्हाला आश्चर्य वाटेल. मी शाळेत असताना 'सकाळ'मध्ये एक कथास्पर्धा होती. त्यात मी आणि फडणीसांनी एकेक गोष्ट पाठवली होती. बक्षीस कुठलं मिळतंय? त्यांनी त्या कथा टाकूनही दिल्या असतील! असे तुरळक प्रयत्न केले होते. माझ्याभोवती इतकी मोठमोठी साहित्यिक माणसं होती. त्यांच्यापुढे मी काय लिहिणार? शब्द मला वश नाहीत हे मला कळलं आहे आणि तसं म्हणाल तर चित्राच्या खाली जे लेखन आहे ते मीच केलं आहे. ते लेखन, ते संवाद म्हणजे माझं साहित्यच आहे. निर्जीव वस्तूंची मी ती–ती भाषा लिहिली आहे. मी दोन दीर्घकथा लिहिल्या आहेत. त्यात 'मीच तो आहे' अशी हकीगत आहे. त्यात चित्रंही आहेत. 'कावळा–चिमणीची मोठ्ठी गोष्ट' अशी ही एक गोष्ट मी लिहिली आहे. त्याच्यापलिकडे जाऊन व्यंगचित्र–कलेसंबंधीही मी लिहिले आहे.

**प्रशांत कुलकर्णी –** व्यंगचित्राकडे आणि विनोदाकडे तुम्ही किती गांभीर्यानं पाहता हे ह्या विवेचनावर दिसून येतं. मला असा प्रश्न विचारायचा आहे, की कलाकारानं त्याच्या कलेशी प्रामाणिक राहावं हे त्याचं पहिलं कर्तव्य आहे. काही वेळा बाहेरील नीतीमत्ता आणि आपण काढलेलं चित्र यांत तफावत आढळते. चित्रकाराला वाटतं की 'मला पटलं तसं मी काढलं' पण बाहेर त्या चित्रामुळे फार गदारोळ होऊ शकतो. लोक कलावंताचं स्वातंत्र्य मान्य करत नाहीत. अशा वेळी जे आहे तसं चित्र काढावं असं तुम्हाला वाटतं का? लोकांचा कल, समज, त्यांची मानसिकता लक्षात घेऊन चित्र काढावं अशी आज परिस्थिती आली आहे असं तुम्हाला वाटते का?

**वसंत सरवटे –** मला असं वाटतं की कलावंताच्या अनेक जाती आहेत. लोकप्रियतेशी सुसंगत कलाकृती निर्माण करणारे कलावंत आहेत तसेच 'मला वाटलं तसं मी चित्र काढलं. तुम्हाला नाही आवडलं तर फेकून द्या' असं म्हणणारेही कलावंत आहेत. प्रत्येकानं आपल्या भावनेशी प्रामाणिक राहावं. माझी विचारसरणी आजुबाजूच्या वातावरणापेक्षा वेगळी आहे. आता मी काय करावं? अशा वेळी मी स्वत:ला फसवणार नाही. मी वेगळं मांडणार नाही. हे चुकीचं आहे हे मला कळतंय, पण माझ्याकडे वेगळं मांडण्याचं धाडस नाही याचा अर्थ मी प्रामाणिक नाही असा होत नाही.

**प्रशांत कुलकर्णी –** गेली साठ वर्षं आपण व्यंगचित्रं आणि हास्यचित्रं काढत आहात. व्यंगचित्रकलेत अनेक वळणे आली. काही वळणं तुम्ही स्वत: निर्माण केलीत. अंतरकर, ठोंबरे अशा अनेक नामवंत संपादकांकडे तुम्ही कामं केलीत. मोठमोठ्या प्रसिद्ध पुस्तकांची मुखपृष्ठं काढलीत. मराठी व्यंगचित्रकला आणि हास्यचित्रकला या संदर्भात असा प्रश्न विचारावासा वाटतो, की चित्रकार, रसिक आणि संपादक या तीन अंगांनी विचार करताना तुम्हाला व्यंगचित्र–कलेचं भवितव्य काय वाटतं?

**वसंत सरवटे –** व्यंगचित्रकलेचा प्रवास एक विशिष्ट अंगानं चालू आहे. पूर्वी व्यंगचित्र मासिकांतून यायची. त्यावेळच्या संपादकांना व्यंगचित्रांविषयी फक्त प्रेमच नव्हे तर समजही असे. व्यंगचित्रांवर संस्कार करायला वेळ असायचा. मी अंतरकरांकडे किंवा दुसऱ्या कोणत्याही संपादकाकडे व्यंगचित्र पाठवलं की त्यात सुधारणा सुचवून ते माझ्याकडे परत पाठवत व सुधारणा करायला सांगत. त्यातून मलाही खूप शिकायला मिळालं.

आता मासिकं बहुतेक बंदच होताहेत. साप्ताहिकांत फारशी व्यंगचित्रं नसतात. आता व्यंगचित्रं 'डेली कार्टून' स्वरूपात असतात. दररोज काढावी लागतात. विचार करायला फारसा वेळ नसतो. दुसऱ्या दिवशी ती विसरली जातात, त्यामुळे त्याच्यावर चर्चा होत नाही. संपादकही त्यासाठी विशेष काही करत नाहीत. जागा भरली की झालं इतकाच विचार बहुतेक ते करत असावेत. आता चित्रकारांना वावच नाही. डे टु डे राजकारणावरच बरीचशी व्यंगचित्रं असतात.

व्यंगचित्रकारानं वाचन करणं आवश्यक आहे पण ते होताना दिसत नाही. ते का वाचत नाहीत हे मला समजत नाही. माझी व्यंगचित्रकलेवर पुस्तकं आहेत. एकंदरीत व्यंगचित्रकलेचं भवितव्य कठीण वाटतं. काही तुमच्यासारखे, अभिमन्यू कुलकर्णीसारखे अपवाद आहेत.

**प्रशांत कुलकर्णी –** आपण भरीव काम केलं आहे असं तुम्हाला वाटतं का? तुम्ही समाधानी आहात का? की अजून बरंच काही करायचं आहे असं तुम्हाला वाटतं?

**वसंत सरवटे –** सुरुवातीला चुटके चित्रित करण्यापासून प्रगती करत शब्दासहित आणि शब्दाविना अशी व्यंगचित्रमालिकांच्या मार्गानं गेली पन्नासहून अधिक वर्षं मी मराठीत हास्यचित्रातून साहित्यिक, सामाजिक आणि कधी कधी राजकीय क्षेत्रांवर चित्रांमधून भाष्य केलं. सजीव–निर्जीव त्याचप्रमाणे रेषा, चौकटी इत्यादी दृश्य घटक हे माझ्या व्यंगचित्रांचे नायक झालेले आहेत. व्यंगचित्रमाध्यमाचं दृश्य अंग मी अनेक प्रकारे रसिकांसमोर ठेवलं. त्यात ठशासारखी दृश्य–चित्रच नव्हे तर अल्ट्रा दृश्यचित्रही आहेत. याकडे पाहिल्यावर मला काहीसं समाधान वाटतं. पण माझ्या व्यंगचित्रातून मी जे विश्व पाहिलं त्यात मराठी इथॉस जास्त आला आहे. ग्लोबलायझेशनच्या ह्या दिवसात प्रत्यक्षात मी वैश्विक विषय शोधले पाहिजेत असं मला वाटतं. शेवटी व्यंगचित्राविषयी मी असं म्हणंन की ''कार्टुन इज ॲन आर्ट फॉर्म ऑफरिंग अ व्हिज्युअल एक्स्पिरिअन्स लेस्ड वुईथ इट हॅविंग वाईड स्पेक्ट्रम् वुईथ सिंपल इनोसंट फन ॲट वन एन्ड, ॲन्ड शार्प कॉमेन्ट सर्टनली सजेस्टिंग सिरियस थॉट प्रोव्होकिंग फिलोसॉफिकल वे ऑफ लाईफ ॲट द अदर.

**शब्दांकन**
**शर्मिला पिटकर**

# अक्षरांचं औंदुबर

**वैजनाथ महाजन**

औंदुबर हे शब्दश: टिकलीएवढे एवढे गाव. खरे तर ते कृष्णातीरीचे दत्त देवस्थान म्हणूनच सर्वज्ञात. या गावची ग्रामपंचायत अंकलखोप. अंकलखोप, औदुंबर व भिलवडी असा हा एक अत्यंत सात्त्विक आणि संपन्न त्रिभुज आहे. भिलवडी गावाला आज चितळेंच्या दुधाचा परिमळ प्राप्त झालेला आहे. अंकलखोप तसे सधन आणि शिक्षणात अग्रणी असलेले गाव. ह्या तीन गावांच्या खांद्याला खांदा लावून उभे असलेले आणखी एक गाव म्हणजे धनगाव. या धनगावचे म.बा. भोसले आणि औदुंबरचे कविवर्य सुधांशू हे शाळेपासूनचे सवंगडी. ह्या दोघांचा आणखी एक मित्र म्हणजे सदानंद सामंत. वयाच्या अवघ्या सत्ताविसाव्या वर्षी सदानंद सामंत हा एकाएकी तापाने फणफणला आणि तडकाफडकी जग सोडून गेला. तो उत्तम कवी होता. आंग्लसाहित्याचा व्यासंगी होता. तो गेला आणि त्याची कविता पण त्याच्याबरोबरच आकाशी विरून गेल्यासारखी होऊन गेली. तशी घटना साऱ्याच परिसराला विद्ध करून गेलेली. पण ह्या दोन मित्रांना मात्र सदानंदचे अकाली आपणातून उठून जाणे काही केल्या गप्प बसू देईना. त्याच्या स्मृती जागवायला हव्यात आणि त्याकरता आपण- साऱ्या त्याच्या सवंगड्यांनी - एकत्र यायला हवे असे वाटले. मकरसंक्रांत उंबऱ्यावर येऊन ठेपली होती आणि दोन्ही मित्रांनी एका क्षणी निर्णय घेतला. यापुढे प्रत्येक संक्रांतीला आपण सदानंदच्या नावाने कवीसंमेलन भरवायचे. कालांतराने हेच संमेलन औदुंबरचे सदानंद साहित्य संमेलन झाले. हा ऐतिहासिक असा सांस्कृतिक निर्णय व्हायचे वर्ष होते एकोणीसशे एकोणचाळीस. तेव्हापासून हे दत्तक्षेत्र साहित्यक्षेत्र बनून गेले. तालेवार साहित्यिकांनी अगत्याने उपस्थिती लावावी असे इथे काहीच नव्हते. आजही नाही तरी, पण ह्या धडपडणाऱ्या मुलांचा अलोट उत्साह पाहून पहिल्या सदानंद संमेलनाला पुण्याहून वामन पोतदार अगत्याने आले. भिलवडी स्टेशनला उतरून टांग्याने औदुंबरक्षेत्री आले. संथ वाहणाऱ्या कृष्णेत न्हाऊन आणि झुळझुळणाऱ्या वाऱ्याने प्रसन्न होऊन गेले. सुधांशूंच्या त्यावेळच्या कुटीतच वरणभात खाऊन सुखावले आणि वाङ्मयीन हितोपदेश करून, आनंद वाटून निघून गेले. हळुहळू साहित्यिकांचा पायरव वाढत गेला. औदुंबरच्या अक्षरांचा दरवळ परिमळ होऊन आसमंतात फुलू लागला, बहरू लागला. फारसा गाजावाजा नाही, भपका तर नाहीच नाही. येणे आणि साहित्यभक्तीने आलेल्या ग्रामस्थांना काही ना काही शिदोरी देऊन जाणे हेच महत्त्वाचे. पाहुणे कधी कऱ्हाडहून येत तर कधी सांगलीला वळसा घालून तीर्थक्षेत्री विसावत. आजुबाजूच्या गावांत तयार झालेले कान तर गाड्या जुंपून येत. दिवसभर काव्याची मैफल कधी गाजत तर कधी वाजत राही. कविसंमेलनाचा अध्यक्ष वेगळा आणि संध्याकाळी रंगणाऱ्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष वेगळा. तोच संमेलनचा प्रमुख अध्यक्ष. कधी अनंत काणेकर होते तर कधी गं.बा. सरदार होते. एक वर्षी गोदातटाकीचे कैवल्यलेणे असलेले नरहर कुरुंदकरसुद्धा कृष्णातीरी अध्यक्ष म्हणून मुक्काम करून गेलेले आहेत. पंजाबचे राज्यपाल काकासाहेब गाडगीळसुद्धा औदुंबर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असल्याची साक्ष कागदोपत्री मिळते. संमेलनाचा कार्यक्रमही अगदी आखीवरेखीव असतो. फापटपसारा नाही. आभाराबरोबरच तिळगूळ देण्यात येतो आणि पुढील वर्षी अध्यक्ष कोण याची चर्चा करत आलेले रसिक प्रसन्नचित्त होऊन गावोगावी परतत असतात.

दुर्गा भागवतांसारख्या ज्ञानमातेनेसुद्धा औदुंबरचे अध्यक्षपद अहेव लेणे मानून आनंदाने स्वीकारलेले होते, तर रौप्यमहोत्सवी अध्यक्षपदी महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व आलेले होते आणि कृष्णाईशी हितगूज करून गेलेले होते. यशवंतराव चव्हाणांसारख्या अभिजात साहित्य रसिकांनी या संमेलनाला आणि त्याच्या साध्या सात्त्विक अदाकारीला भरभरून दाद दिलेली आहे. इथे मानपान असा काहीच मामला असत नाही. कविदादा म्हणजेच सुधांशु आणि म.बा. भोसले देतील तोच मान आणि तेच पान. याबाबत कधी कुणाची कसली म्हणून तक्रार असत नाही. कारण हा प्रतिवर्षीचा निखळ साहित्यसोहळा असतो. कसल्याही डामडौलाशिवाय आणि ढोलताश्याशिवाय. प्रत्येक साहित्यधर्मीने कर्तव्य समजून इथे हजेरी लावावी अशीच अपेक्षा असते आणि गेली पासष्ट वर्षे विनाविघ्न पुरी होत आलेली आहे हे अधोरेखित करायलाच हवे. हे सारे होते ते अक्षरांच्या ओढीने आणि साहित्याच्या गोडीने. अगदी निरपेक्ष आणि निर्लेप भावनेने. वर्गणी नाही की पावतीपुस्तके नाहीत. ठराव नाहीत की घटनादुरुस्त्या नाहीत. आतल्या-बाहेरच्या बैठका असला पण काही कारभार इथे असत नाही. जे असते ते नीटनेटके आणि शुद्ध बीजापोटीच असते. अलिकडे तर औदुंबर साहित्य संमेलनाचा अध्यक्ष हाच पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होतो असा एक अघोषित संकेत निर्माण झाल्याचे चित्र आहे. अरुण साधू, म.द. हातकणंगेलकर ही ठळक नावे तर समोर आहेतच. पण आणखी काही नावे अशीच सन्मानित झालेली आहेत. कृष्णा वाहते आहे. दत्तगुरू स्थिरपदी आहेत. औदुंबरचा अक्षरवृक्ष

प्रतिवर्षी नव्या चैतन्याने सळसळतो आहे आणि तसा लेखनधर्मीची उमेद वाढवतो आहे. संमेलन सानंद सुरू आहे.

शंकर पाटील, शंकरराव खरात, ना.सं. इनामदार, माडगूळकरबंधू, मधुमंगेश कर्णिक, हे आणि असे आजवर एकूण पासष्ट औदुंबराध्यक्ष झालेले आहेत. कथाकार म.बा. भोसले व सुधांशू अनंतात विलीन झाले. पण त्यांनी लावलेला हा अक्षरवृक्ष मात्र त्याच डौलात, त्याच दिमाखात कृष्णातीरी डोलतो आहे. धुरा खांद्यावर घेणारी नवी पिढी हजर आहे. पुरुषोत्तम जोशी, शहाजी सूर्यवंशी, सुभाष कवडे आणि त्यांचे साथीदार. ह्या साऱ्यांच्या पाठीवर आपल्या पिंपळातून साहित्याचे सुवर्ण काढणाऱ्या श्रीनिवास विनायक कुळकर्णी यांचा भारदस्त हात आहे. त्यांचे यथार्थ असे मार्गदर्शन असते. त्यांचा इथला वावर साऱ्यांनाच उमेद देत असतो. गेली पासष्ट वर्षे सुरू असलेला हा संमेलनाचा एक आगळावेगळा अक्षरोत्सव आहे. विजया राजाध्यक्ष अध्यक्षपदावरून म्हणाल्या होत्या, की मला तर हा सर्वोच्च असा बहुमान वाटतो आहे. कारण ह्या साऱ्यात एक अत्यंत पारदर्शक अशी उत्स्फूर्तता आहे. आत्मीय अशी अक्षरप्रेरणा आहे. संमेलनाची आज फारशी अपूर्वाई राहिलेली नाही. ती वर्धिष्णू होतच आहे. त्याचा आनंदच आहे. औदुंबरच्या संमेलनाचा मात्र केवळ आनंद नाही तर आल्हाद आहे. कोणताही जामानिमा नसलेले आणि चौघडे, पायघड्या नसलेले हे एक चिरंजीव संमेलन आहे. ते वनराईतील संमेलन आहे. नदीकाठी संस्कृती फुलते आणि बहरते याची साक्षात प्रचिती देणारे असे संमेलन आहे. दोन मित्रांच्या जिव्हाळ्यातून तिसऱ्या मित्राच्या स्मृतिप्रीत्यर्थ कृष्णाकाठी उभारलेला हा एक लोभसवाणा असा साहित्य सोहळा आहे. कोणी त्याला सदानंद साहित्य संमेलन म्हणतात तर कोण संक्रांत साहित्य संमेलन, पण येतात जरूर. इथली हजेरी म्हणजेच अखिल भारतीय साहित्य संमेलनाची हजेरी असे पण म्हणतात. औदुंबरचे हे अक्षर संमेलन अशीच सांस्कृतिक प्रेरणा देत राहो, हीच मनोकामना!

**वैजनाथ महाजन**
ओमकार क्र. १, गणेशनगर,
डॉ. आंबेडकर मार्ग,
सांगली -४१६४१६


## उषा मेहता यांचे दोन कवितासंग्रह

### मितवा (मालिका-कविता)

'कसं आहे जीवन खरंच?
अथांग... अपार... आणि कुरूपही
पण सुंदर आहे जीवन,
तुझ्या संगतीनं जगताना'




नव्या पिढीची प्रेमकविता
मूळ किंमत ५० रुपये
सवलतीत ३० रुपये
घरपोच ४० रुपयांत!

### निरंतर

'निरंतर'मुळे उषा मेहतांची कविता माझ्या अधिक जवळ आली. तशी ती अन्य कवींच्या व वाचकांच्याही जवळ येईल याबद्दल मला तरी शंका वाटत नाही.

**– विजया राजाध्यक्ष**




निसर्ग, स्त्री, पुरुष
यांच्यातील संबंधांचा 'निरंतर' शोध
मूळ किंमत २०० रुपये
सवलतीत १२० रुपये
घरपोच १३५ रुपये

# माझी मी (आत्मकथन)

**प्रा. सिंधू पटवर्धन**

'माझी मी' हे यशोधरा गायकवाड यांचे आत्मकथन वाचून एका सुसंस्कृत, सुजाण आणि सुविद्य अशा आदर्श मुख्याध्यापिकेचा परिचय झाल्याचं मानसिक समाधान वाचकाला लाभतं. सध्याच्या गतिमान युगात अशी व्यक्तिमत्त्वं सापडणं दुर्मिळच झाले आहे. यशोधराबाईंच्या आत्मकथनाचं नाव आहे, थोडेसे विचित्र वाटणारं पण लक्षवेधी! म्हणूनच पुस्तकत उघडताच प्रथम यशोधराबाईंचं 'मनोगत' वाचलं. आपल्या 'मनोगता'त बाई लिहितात, '' 'माझी मी' जगले. संसार थाटला, तो चार माणसांचा. दोनाचे चार हात झाले. सुरुवातीला अतिशय रम्य दिवस. आशा-आकांक्षांची पूर्तताच जणू, परंतु नंतरचा प्रवास एकटीनं. म्हणूनच 'माझी मी'....''

आदर, प्रेम, जिव्हाळा या अत्युच्च मानवी मूल्यांचं कळत-नकळत पालन करणारं एक दलित कुटुंब म्हणजे बाईंचं माहेर. बाईंच्या (माहेरचं गजराच्या नाव) माहेरचा गोतावळा तसा फार मोठा. आई, वडील, मोठा भाऊ, वहिनी, मोठी बहीण, दोन चुलते, त्यांची मुलं-चुलत भावंडं, चार मावश्या, त्यांचे यजमान, आत्या, त्यांची मुलं इत्यादी. एकमेकांना मदत करणं, अडीअडचणीला धावून जाणं हे आपलं कर्तव्य आहे असं मानणारं हे भलंमोठं कुटुंब. या कुटुंबातील माणसांची बाईंनी रेखाटलेली व्यक्तिचित्रं लक्षवेधी आहेत. बाईंना सर्वांत आदरणीय वाटणारी व्यक्ती म्हणजे त्यांचे वडील- दगडू देऊ वाघचौडे ऊर्फ जोशीबुवा; खांडपे या खेडेगावातील पुढारलेल्या विचारांची (बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रभाव असणारी) प्रतिष्ठित व्यक्ती. मानवजातीवर आणि प्राणिमात्रांवर प्रेम करणं हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांनी आपल्या मुलांवर- दोन मुली व एक मुलगा चांगले संस्कार केले. सुमारे साठ-सत्तर वर्षांपूर्वी हा दलित कुटुंबातील माणूस आपल्या मुलींना गाणी शिकवतो. देवाजीने करुणा केली। भाते




पिकूनी पिवळी झाली. एक ते शंभर अंक व सर्व पाढे- पावकी-निमकी मुलींकडून म्हणवून घेतो. संध्याकाळी भिंतीजवळ उभे राहून परवचा घेतो. खरंच सारंच अजब वाटतं आणि बाईंच्या बाबांबद्दल वाचकांनाही आदर वाटू लागतो. बाईंनी एका ठिकाणी लिहिलं आहे, की त्यांचे आदर्श दोन- एक त्यांचे बाबा आणि दुसरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

बाईंची आई सीताबाई अशिक्षित. तिची सर्व कामं जडभारी. शेणगोठा, स्वयंपाकपाणी, भाकरतुकडा, लाकूडफाटा, पावसाळ्यात शेणाचं खतपाणी. ही बाई पुरुषासारखी कमरेला पाठीमागून कोयता खोचायची. ओझ्याला पण पक्की बाकी (शक्तिवान). रानातून सुक्या काटक्या न आणता चुलीत जाळण्यासाठी नग्गी लाकडं आणायची आणि महारकीच्या पाहणीची (दारोदार शिळे तुकडे मागणं) भाकरीसुद्धा मागायची. पण असं असलं तरी आपल्या सुसंस्कृत नवऱ्याचे अनुकरण करायची. भाऊ देऊ हा मोठा दीर. दीर विधूर झाल्यावर त्यांच्या मुलांचा सांभाळ ह्या चुलतीनंच केला. ही मुलं शिकून मोठी होईपर्यंत त्यांचं केलं. नंतर स्वतःच्या मुलांचं. अशी ही नवरा-बायको. बाईंचे आई-वडील. आपल्या कुटुंबाचा प्रेमाने व जिव्हाळ्याने सांभाळ करणारे! त्यांचे सगेसोयरेसुद्धा तसेच. एकमेकांचा आदर राखणारे. एकमेकांना मदत करणारे.

बाईंच्या सुंदर प्रेममयी, आनंददायी कौटुंबिक भावविश्वाला छेद देते ती सामाजिक विषमता, जातीयता. दलितांवर त्या काळात- साठ-सत्तर वर्षांपूर्वी - होणारा अन्याय बाईंनी अनेक प्रसंग देऊन कथन केला आहे. बाई लिहितात, ''महारकी एकूण वस्तीत वाटलेली असायची. एखाद्या गावात एकच घर असायचे. मग त्या घरातील, कुटुंबातील माणसं गावाची सर्व कामं करायची आणि आयुष्यभर गुजराण करायची. त्यांना या कामांच्या व्यतिरिक्त स्वतःचं अन्य कोणतंही खाजगी काम करायला सवड सापडायची नाही...''

हा समाज 'पोट भरण्यासाठी' कल्याणच्या वीटभट्टीत काम करणं, वांद्र्याला हमाली करणं, भिवंडी-वाडे येथे झोडणीच्या दिवसांत भारे झोडणं अशी कामं करू लागला. त्यासाठी लोक बायका-मुलांना शहरात घेऊन जाऊ लागले. उन्हाळ्याचे आठ महिने बाहेर काढून, मुलांना इमारतीच्या सावलीत कुठेतरी ठेवून, रात्री रेल्वे प्लॅटफॉर्मवर झोपून दिवस कंठू लागले. कारण

बाबासाहेबांनी महारकी बंद केल्यावर कुणबी समाज मजुरी देईनासा झाला. गावोगावी वाळीत टाकल्यासारखे केले. गावचा रस्ता बंदच केला.

माहेरी आई-वडिलांच्या लाडा-कोडात आणि समस्त नातेवाईकांच्या कौतुक वर्षावात न्हाऊन निघालेल्या गजराला लग्न झाल्यावर मात्र संकटांशी सामना करतच आपलं आयुष्य जगावं लागलं. विशेष म्हणजे त्यांच्या स्थितीला कारणीभूत झाले ते त्यांचे यजमान यशवंतराव गायकवाड. त्यामुळे लग्नानंतर पुढील आयुष्य खरं तर भयानक अशा जीवघेण्या संकटांना सामोरं जाण्यातच गेलं. धैर्यानं व समर्थपणे तोंड देत स्वत:चे सांसारिक जीवन यशस्वी करून दाखवणाऱ्या स्वाभिमानी, कर्तृत्ववान स्त्रीचं हे चित्रण आहे असं जाणवतं. म्हणूनच 'माझी मी'!

यशवंतराव धर्मांतरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'दीक्षा विधी'साठी नागपूरला गेले. यशवंतराव बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी व कार्यकर्ते होते. रिपब्लिकन पार्टीचे सेक्रेटरी व झोपडीसंघाचे सेक्रेटरी म्हणून ते कार्यरत होते. पण सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या गायकवाडांना नोकरी करणं मात्र फारसं जमलं नाही. यशोधराबाईंना मुंबई महानगर-पालिकेत नोकरी करण्याची जबरदस्त इच्छा होती. कारण त्यात भरपूर पगार व हव्या तेथे बदल्या करून घेण्याची शक्यता होती. प्रयत्नांनंतर त्यांना मुंबई महानगरपालिकेच्या विक्रोळी टागोरनगर नं. १ या शाळेत ११ सप्टेंबर १९६३ रोजी हजर होण्याचं पत्र मिळालं.

बाईंच्या समोर सतत प्रश्नचिन्ह असायचे ते जागेसंबंधी. झोपडपट्टीत राहायचं. तेथे अनेक प्रश्न. घरात पाणी नाही प्यायला. उघड्या झोपड्यांत कडाक्याचं ऊन, खर्चायला पैसा नाही नि खायला अन्न नाही. अन्नान्न दशेनं बेजार झालेल्या बाईंनी शेवटी 'झिडस्या'ला जायचं ठरवलं. तिथं हातच्या बांधलेल्या घराचा निवारा तरी त्यांना मिळाला. पण झिडक्याहून भांडूपच्या शाळेत नोकरीला येणं कर्मकठीण. मुलांच्या स्वास्थ्यासाठी या बाईंनी तेही हलाहल पचवलं आणि मुलांनी त्यांचे पांग फेडले.

बाईंची पाचही मुलं हुशार, कर्तबगार निघाली; सुसंस्कारित निघाली. मोठा मुलगा जयंत पदवीधर होऊन, डेप्युटी कलेक्टरची परीक्षा पास होऊन औरंगाबादला डेप्युटी कलेक्टर झाला. दुसरा मुलगा संजय. जे.जे. मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस. झाल्यावर पुढे डी.वाय.एस.पी.ची परीक्षा देऊन पोलिसदलात जाऊन, आज वरिष्ठ पदावर आहे. धाकटा राजय बी.ए.,-एलएल.बी. आहे. मुलगी संघमित्रा सिद्धार्थ कॉलेजमधून पदवीधर झाली आणि धाकटी मुलगी अभिनया एम.ए., एलएल.बी. (स्कॉलर). तिला लंडन युनिव्हर्सिटीनं आमंत्रित केल्यानं वर्षभरासाठी लंडनला गेली होती. 'मानवी हक्क' हा तिचा अभ्यासविषय होता. १९९९ साली ब्रिटिश हाय-कमिशनच्या 'शेव्हनिंग स्कॉलरशिप'मध्ये पश्चिम भारतातून ती एकमेव निवडली गेली. ती सोमय्या कॉलेज, विद्याविहार येथे पॉलिटिक्स विभागाची मुख्य आहे.

सर्वच भावंडांचं एकमेकांवर अतिशय प्रेम, त्यामुळे गरिबीत राहूनही त्यांनी आपल्या आईला खूप 'समाधान' दिलं. बाई त्यांना कौतुकाने 'पंचरत्न' असं संबोधत आणि त्या संबोधनाला ती पुरेपूर उतरली हे यशोधरा-बाईंचं महद्भाग्य!

आपल्या स्वत:च्या मुलांप्रमाणेच बाईंनी शाळेतील विद्यार्थ्यांनाही प्रेमानं वागवलं. विद्यार्थ्यांना शिक्षा तर केली नाहीच, परंतु त्यांच्या घरची परिस्थिती समजावून घेऊन कित्येक वेळा पालकांनाही मार्गदर्शन करत राहिल्या. म्हणूनच त्यांना 'आदर्श शिक्षिके'चा पुरस्कार मुंबई महानगर-पालिकेकडून प्रदान करण्यात आला. या सगळ्या धकाधकीच्या जीवनात बाई हिंदी 'प्रबोध' परीक्षा पास झाल्या. १९७३ साली एसएससी झाल्या. त्यांचा हा शैक्षणिक दर्जा, उंची वाढवण्यासाठीचा प्रयत्न कौतुकास्पद आहेच, पण वाचकाला मार्गदर्शन करणाराही आहे.

शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या या त्यांच्या प्रयत्नामुळेच २००० साली आपल्या स्कॉलर मुलीबरोबर- अभिनयाबरोबर लंडनला गेल्यावर तेथील शैक्षणिक व सामाजिक जीवनाचं भारताच्या दृष्टीनं तुलनात्मक निरीक्षण त्यांना करता आलं. आजही आपल्या सेवानिवृत्तीनंतर आपल्या घराजवळील नगरपालिकेच्या शाळेत अभ्यासात मागे असलेल्या मुलींचा अभ्यास त्या घेतात.

स्वत:ची शाळा काढण्याचं स्वप्नही त्यांनी उराशी बाळगलं आहे. लग्नानंतरचं हे सर्व घटनाचित्र बाईंनी अतिशय संयमाने व अलिप्ततेनं रेखाटलं आहे हे आवर्जून सांगितलं पाहिजे. कोणतीही कौटुंबिक जबाबदारी न स्वीकारणाऱ्या आपल्या पतीबद्दल त्यांनी कुठेही अनुदार उद्गार काढलेले नाहीत. एवढेच नव्हे तर आपला पती निर्व्यसनी आहे, सामाजिक कार्य अतिशय निष्ठेनं आणि जिव्हाळ्यानं करतो, त्याच्याकडे अमोघ वक्तृत्व गुण आहे याचा बाईंना वाटणारा सार्थ अभिमान अनेक ठिकाणी व्यक्त झाला आहे.

बाईंच्या लेखनाला आत्मगौरव किंवा आत्मसमर्थनाचा स्पर्शही झालेला नाही. आत्मकथा लेखनात हा सापडणारा दुर्मीळ गुण!

**प्रा. सिंधू पटवर्धन**
**५०३ देवीदर्शन, टेंभीनाका,**
**ठाणे (प.) ४०० ६०१**